


विश्वसनीय बातम्यांचे एकमेव वृत्तपत्र

# दैनिक यशवंत




✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/रविवार दि. १८ फेब्रुवारी २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१००✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦


## मराठा आंदोलक तिसऱ्या दिवशीही आक्रमक

मुंबई : मराठा आरक्षणाच्या मागणीवर सरकारकडून देण्यात आलेल्या अध्यादेशावर अद्याप अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे मनोज जरांगे पाटलांनी पुन्हा एकदा उपोषणाला सुरुवात केली आहे. मागणी मान्य होत नसल्याने राज्यभर अनेक जिल्ह्यांत मराठा बांधव आक्रमक झाले आहेत. गेल्या तीन दिवसांपासून आंदोलन सुरू आहे. यामुळे सामान्य नागरिकांचे हाल होत आहेत.

लातूरमध्ये मराठा समाजाच्या वतीने सलग तिसऱ्या दिवशी देखील चक्काजाम आंदोलन करण्यात आले आहे. आंदोलनादरम्यान माजी आमदार दिनकर माने यांची गाडी मराठा तरुणांनी अडवली. संतप्त मराठा तरुणांनी गाडीच्या समोर झोपत निषेध व्यक्त केला आहे. तसेच लातूर-सोलापूर महामार्ग मराठा तरुणांनी अडवला आहे. यावेळी त्यांनी गर्दीतून वाट काढत रुग्णवाहिकेला रस्ता दिला.

एसटी सेवा बंद, ८० लाखांचे नुकसान नांदेड जिल्ह्यात आजही एसटी बससेवा बंद आहे. गेल्या दोन-तीन दिवसांपासून जिल्ह्यात मराठा आरक्षणासाठी ठिकठिकाणी आंदोलनं होत असून रस्ते अडवले जात आहेत. त्यामुळे एसटी सेवा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. शुक्रवारी लांब पल्ल्याच्या गाड्या रद्द करण्यात आल्या होत्या. तर काल सकाळपासून संपूर्ण जिल्ह्यात एसटी बससेवा बंद करण्यात आली आहे. पोलिस प्रशासनाच्या आदेशानुसार एसटी **(पान ७ वर)**

## भाजप आणखी कांही निर्णय घेण्यासाठी सत्ता मागत आहे



नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय अधिवेशनात कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना संबोधित केले. यावेळी ते म्हणाले की, भाजपचा कार्यकाळ देशसेवेसाठी काही ना काही करतच असतो. देश आता प्रगती करत आहे. सत्तेसाठी तिसरा कार्यकाळ मागत नाही, तर आणखी काही निर्णय घेण्यासाठी सत्ता मागत आहे, असं म्हणत पंतप्रधान मोदी यांनी येणाऱ्या काळातील आणखी काही मोठ्या निर्णयांचे संकेत दिले आहेत.

पंतप्रधान मोदी म्हणाले, मागच्या दहा वर्षांत देशाने गतीने प्रगती केली आहे. हे एकटा मी म्हणत नाही तर सगळं जग गाजावाजा करुन ही बाब सांगते आहे. प्रत्येक क्षेत्रात भारताच्या प्रगतीचा आलेख उंचावला आहे. एक मोठा संकल्प आणि प्रत्येक भारतीय जोडला गेला आहे. त्यामुळे आपला देश छोटी स्वप्नं पाहू शकत नाही आणि संकल्पही छोटे करु शकत नाही असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं. आपल्याला भारत विकसित देश करायचा आहे हे आपलं स्वप्न आहे. यासाठी पुढच्या पाच वर्षांची खूप मोठी भूमिका असणार आहे. पुढच्या पाच वर्षांत आपल्याला विकसित भारतासाठी एक प्रचंड हनुमान उडी घ्यायची आहे. आपल्याला जर अशी हनुमान उडी घ्यायची असेल तर सरकारमध्ये भाजपा परत येणं आवश्यक आहे हे विसरु नका, असंही पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

भाजपाला ३७० जागा जिंकाव्याच लागतील

आज विरोधी पक्षातले नेतेही एनडीए सरकार चारशे पार चे नारे देत आहेत. हे लक्ष्य गाठायचं असेल तर भाजपाला ३७० जागा **(पान ७ वर)**

## शिवजयंतीदिनी दांडपट्ट्याला राज्यशस्त्र म्हणून दर्जा देणार



मुंबई : शिवराज्याभिषेकाच्या ३५० व्या वर्षानिमित्त शिवजयंतीच्याच दिवशी दांडपट्ट्याला राज्यशस्त्र म्हणून घोषित करण्यात येणार आहे, अशी माहिती सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती १९ फेब्रुवारीला संपूर्ण राज्यात साजरी होणार आहे. दरवर्षीप्रमाणे किल्ले शिवनेरीवर शासकीय कार्यक्रम होईल. तर राज्याच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने रात्री आठ वाजता आग्र्यात लाल किल्ल्यात शिवजयंती साजरी करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार, सांस्कृतिकमंत्री सुधीर मुनगंटीवार उपस्थित राहणार आहेत.

शिवजयंतीच्या निमित्ताने आग्र्याच्या किल्ल्याच्या दरबारात दांडपट्टा या शस्त्राला राज्यशस्त्र म्हणून जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती मुनगंटीवार यांनी दिली आहे. यापुढे राज्यशस्त्र म्हणून दांडपट्ट्याची नवी ओळख निर्माण होणार आहे.

आग्र्याच्या लाल किल्ल्यात छत्रपती शिवाजी महाराजांचा औरंगजेबाने भरदरबारात अपमान केला. त्याच दरबारात येत्या सोमवारी जय शिवाजी-जय भवानीच्या घोषणांचा जयघोष होईल आणि शिवजयंतीच्या निमित्ताने ऐतिहासिक दांडपट्ट्याला राज्यशस्त्र **(पान ७ वर)**

## विलासराव देशमूख यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण




**लतूर /प्रतिनिधी-** तालुक्यातील निवळी येथील विलास सहकारी साखर कारखाना येथे उभारण्यात आलेल्या माजी मुख्यमंत्री, लोकनेते विलासराव देशमुख यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण व विलास भवन या कारखान्याच्या प्रशासकीय इमारतीचा शिलान्यास रविवारी (दि. १८) मोठ्या थाटात राज्यभरातील मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी लोकनेत्याच्या कार्याला उजाळा दिला. यावेळी अनेकांच्या डोळ्यांच्या कडा पानावल्या.

अध्यक्षस्थानी माजी मंत्री दिलीपराव देशमुख होते. यावेळी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी केंद्रीय मंत्री पृथ्वीराज चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, अखिल भारतीय आदिवासी काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शिवाजीराव मोघे, कारखान्याच्या चेअरमन वैशालीताई देशमुख, सिनेअभिनेते रितेश देशमुख, लातूर ग्रामीणचे आमदार धीरज देशमुख, प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष चंद्रकांत हंडोरे, माजी गृहराज्यमंत्री सतेज पाटील, माजी राज्यमंत्री विश्वजित कदम, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते उल्हास पवार, माजी मंत्री, आमदार अमित देशमुख, काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे मुख्य प्रतोद सुरेश वरपूडकर, अभिजित वंजारी, सुवर्णताई देशमुख, ट्वेन्टी वन ॲग्रीच्या संचालिका अदिती देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पटोले म्हणाले, आज देश कठीण परिस्थितीतून जात आहे. छत्रपती राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार संपवण्याचा प्रयत्न होत आहे. या परिस्थितीत माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्यासारख्या नेतृत्त्वाची प्रेरणा घेऊन राज्यघटना आणि देशातील लोकशाही वाचवण्यासाठी काँग्रेसच्या माध्यमातून पुढे येण्याची गरज आहे. विरोधी पक्षाची फोडाफोडी करून लोकशाही कमकुवत करण्याचे काम भाजपकडून होत आहे. अलीकडेच काँग्रेसमध्ये अशी एक फुट पडली आहे. परंतु, गटातटाच्या राजकारणातील एक **(पान ७ वर)**

## संत शिरोमणी आचार्य विद्यासागर महाराज यांनी घेतली समाधी



मुंबई : जैन समाजाचे सध्याचे आचार्य विद्यासागर महाराज यांनी देहत्याग करून पूर्ण विधीपूर्वक समाधी घेतली. त्यांच्या समाधी घेण्यामुळे आज संपूर्ण जैन समाज शोकाकुल झाला आहे. रात्री २.३५ वाजता त्यांनी या जगाचा निरोप घेतला.

ते आचार्य ज्ञानसागर यांचे शिष्य होते. आचार्य ज्ञानसागर यांनी समाधी घेतल्यावर त्यांनी आचार्यपद मुनी विद्यासागर यांच्याकडे सोपवले. अशा स्थितीत वयाच्या अवघ्या २६ व्या वर्षी २२ नोव्हेंबर १९७२ रोजी मुनी विद्यासागर आचार्य बनले.

आचार्य विद्यासागर महाराज यांनी यापूर्वीच आपल्या आचार्यपदाचा राजीनामा देऊन आपले आचार्यपद त्यांचे आद्य मुनी शिष्य निर्यापक श्रमण मुनी श्री समयसागर यांच्याकडे सोपवले. ०६ फेब्रुवारीलाच त्यांनी मुनी समयसागर आणि मुनी योगसागर यांना खासगीत बोलावून त्यांच्याकडे जबाबदारी सोपवली होती, असे सांगण्यात येत आहे. समयसागर आणि योगसागर हे दोन मुनी त्यांचे पूर्वाश्रमातील सख्खे भाऊ आहेत.

आचार्य विद्यासागर महाराज यांचा जन्म कर्नाटकातील बेळगाव येथील सदलगा गावात १९४६ मध्ये शरद पौर्णिमेच्या दिवशी १० ऑक्टोबर रोजी झाला. आचार्य विद्यासागर महाराज यांना पूर्वाश्रमातील ३ भाऊ आणि २ बहिणी आहेत. तीन भावांपैकी दोन भाऊ आज भिक्षू आहेत आणि एक भाऊ महावीर प्रसाद हे देखील धार्मिक कार्य करतात. आचार्य विद्यासागर महाराज यांच्या बहिणी स्वर्णा आणि सुवर्णा यांनीही त्यांच्याकडून ब्रह्मचर्याची दीक्षा घेतली. आचार्य विद्यासागर महाराज यांनी आत्तापर्यंत ५०० हून अधिक दीक्षा दिल्या आहेत. अलीकडेच ११ फेब्रुवारीला, आचार्य विद्यासागर महाराज यांचा गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये विश्र्वातील देवता म्हणून गौरव करण्यात आला.

आई-वडिलांनीही समाधी घेतली -

आचार्य विद्यासागर महाराज यांच्या आई-वडिलांनीही त्यांच्याकडून दीक्षा घेऊन समाधीमृत्यू प्राप्त केला. आचार्य विद्यासागर महाराज यांना संपूर्ण बुंदेलखंडमध्ये छोटे बाबा म्हणून ओळखले जाते. कारण त्यांनी मध्य प्रदेशातील दामोह जिल्ह्यातील कुंडलपूर येथील मंदिरात बडे बाबा आदिनाथ भगवान यांची मूर्ती स्थापन केली होती आणि कुंडलपूरमध्ये अक्षरधामच्या धर्तीवर भव्य मंदिरही बांधले होते.








# इस्रायल कोणत्याही दबावाला नाही झुकणार

तेल अवीव : हमासच्या दहशतवाद्यांचा खात्मा करण्यासाठी गाझामधील रफाह भागात घुसलेल्या इस्रायली सैन्याविरुद्ध आमचा देश कोणतेही तडजोड करणार नाही आणि कोणत्याही दबावापुढे झुकणार नाही, आम्हाला हमासचा पूर्णपणे खात्मा करायचा आहे.

असे इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी म्हटले आहे.नेतान्याहू यांचे हे विधान अशा वेळी आले आहे. ज्यावेळी रफाहमध्ये इस्रायलच्या मोहिमेविरोधात आंतरराष्ट्रीय समुदायाकडून दबाव वाढत आहे. अमेरिका आणि इतर देशानी राफावरील हल्ला विनाशकारी असल्याचे म्हटले आहे, मात्र इस्रायल या दबावाला झुकणार नाही, आपली कारवाई सुरूच ठेवेल असेही नेतान्याहू यांनी म्हटले.

दरम्यान इस्रायलचे सैन्य रफाहमध्ये घुसण्यापूर्वी तेथील नागरिकांना बाहेर काढण्यासाठी आम्ही योजना आखली होती, त्यानुसार त्यांना बाहेर काढण्यात येत येत असल्याचेही इस्रायलने म्हटले आहे. इजिप्तच्या गाझा सीमेवर असलेल्या रफाह ताब्यात घेतल्याशिवाय हमासलाचा रोखले जाऊ शकत नाही. उरलेल्या १३४ ओलिसांपैकी काहीजण रफाहमध्ये असल्याचे समजते आणि हमासनेही या भागात आश्रय घेतला आहे. रफाहा हमासचा शेवटचा गड आहे, आम्ही युध्द हारणार नाही. असेही बेंजामिन नेतन्याहू यांनी म्हटले आहे.

# या वर्षीचे अंतरीम बजेट हे सप्तरंगी स्वरूपाचे आहे-प्रा.डॉ.भीमाशंकर हालमंडगे

मुखेड- कुठल्याही राष्ट्राच्या विकासाचा वर्षाचा आराखडा राष्ट्रपतीच्या परवानगीने पंतप्रधान त्यांच्या अर्थमंत्र्यांना सादर करावयास लावतात.त्यालाच आपण अंदाजपत्रक असे म्हणतो. अंदाजपत्रकात परिस्थितीनुरूप बदल होतो.अंदाजपत्रकात यावर्षी शेती,औद्योगिक क्षेत्र, सेवा क्षेत्राला महत्त्व दिले आहे.आता सेवा क्षेत्रातून ५६%,औद्योगिक क्षेत्रातून २७ ते २८% तर शेतीतून १४ ते १८% उत्पन्न देशाला मिळते आहे.खरे तर तुटीचा अर्थसंकल्प प्रेरणा देणारा ही ठरू शकतो. स्वातंत्र्यापासून आजपर्यंत आपला जेडीपी केवळ पाच ते सहा टक्केच राहिला आहे. या अंदाजपत्रकात विद्यार्थी, महिला, उद्योग, कामगार, शिक्षण यासारख्या क्षेत्रांना विशेष महत्त्व दिलेले आहे.मूलभूत सुविधा, आरोग्य, सोलार एनर्जी हे ही क्षेत्रे महत्त्वाची मानली आहेत. यावर्षीचे अंतरिम बजेट हे सप्तरंगी स्वरूपाचे आहे असे प्रतिपादन ग्रामीण (कला, वाणिज्य व विज्ञान) महाविद्यालय वसंतनगर ता.मुखेड जी.नांदेड येथे अर्थशास्त्र विभागाकडून आयोजित केंद्रीय अर्थसंकल्प २०२४-२५ या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून बोलताना प्रा.डॉ. भीमाशंकर हामंडगे यांनी केले. अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरिदास राठोड राष्ट्रसंत सेवालाल महाराज यांच्या जयंतीच्या औचित्य साधून बोलताना म्हणाले की प्रत्येक संतांनी सारखेच काम केले.राष्ट्रसंत सेवलाल महाराजांनी स्वाभिमान सोडू नका, पशुचे महत्व, पाण्याचे महत्व भविष्यात राहणार आहे त्याचे महत्त्व आजपासूनच लक्षात घ्या,इतरांवर विश्र्वासून पूर्णपणे राहू नका पण आपल्यावर इतरांचा विश्र्वास बसेल असे वागा असे विचार सांगितल्याचे त्यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अर्थशास्त्र विभागप्रमुख तथा उप प्राचार्य अरूणकुमार थोरवे यांनी करून कार्यक्रम आयोजना पाठीमागची भूमिका विशद केली. सूत्रसंचलन प्रा.नागनाथ शेटकर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. श्रीकांत जेवळे यांनी करून दिला तर आभार प्रा.डॉ. व्यंकट चव्हाण यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक,विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कानेगावच्या जिल्हा परिषदेच्या शाळेत जंतनाशक गोळ्यांचे वाटप



लातूर / प्रतिनिधी- वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत कृषि महाविद्यालय लातूर येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमीत्त क्रीडा व सांस्कृतिक सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. या सप्ताहाचे उद्घाटन, उद्घाटक व अध्यक्ष कुलगुरु डॉ. इंद्र मणि यांचे हस्ते आणि प्रमुख अतिथी विधान परिषद सदस्य तथा विद्यापीठ कार्यकारी परिषद सदस्य मा. आमदार सतिश चव्हाण व कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य, डॉ.बाबासाहेब ठोंबरे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलन तसेच वसंतराव नाईक व नटराज यांच्या मुर्तिपुजनाने करण्यात आली.

यावेळी मार्गदर्शन करताना कुलगुरु डॉ. इंद्र मणि असे म्हणाले की, सर्वांगीण विकासासाठी विद्यार्थ्यांनी अभ्यासा व्यतिरिक्त खेळ व कला प्रकारात सहभाग नोंदविणे आवश्यक आहे. राष्ट्रीय तसेच राज्य स्तरावरील विविध स्पर्धांमध्ये कृषि महाविद्यालय, लातूरचे विद्यार्थी सतत चमकदार कामगिरी करत असतात. महाविद्यालय स्तरावर होणा-या विविध क्रीडा व कला स्पर्धा यासाठी पोषक वातावरण तयार करत असतात. विद्यार्थ्यांनी अशा स्पर्धांमध्ये सहभागी होऊन आपले कौशल्य विकसीत करावे. मा. आमदार सतिश चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन क्रीडा व सांस्कृतिक कला प्रकारात लातूर पॅटर्न तयार करावा असे आवाहन केले. कार्यक्रमासाठी सौ. जयश्री मिश्रा, विद्यापीठाचे संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि) डॉ. उदय खोडके, परिसरातील विविध महाविद्यालयांचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ. जगदीश जहागिरदार, डॉ. मोहन पाटील, डॉ.संजीव बंटेवाड, डॉ.रणजीत चव्हाण, विद्यापीठ अभियंता श्री. दिपक कशाळकर, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. पुरुषोत्तम झंवर, गळीतधान्ये विशेषज्ञ डॉ.मोहन धुप्पे, विस्तार कृषिविद्यावेत्ता प्रा. अरुण गुट्टे, कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य प्रा. अशोक घोटमुकले तसेच महाविद्यालयाचे वरिष्ठ प्राध्यापक डॉ.विश्वनाथ कांबळे व डॉ.दिनेशसिंग चौहान मंचावर उपस्थित होते.

या क्रीडा व सांस्कृतिक सप्ताहात विविध क्रिडा स्पर्धा, नृत्य, गायन, वक्तृत्व, काव्यवाचन इ. स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांचे परिक्षण सौ. ज्योती पोरे तोरांबेकर, सौ.ऋतुजा फंड, डॉ.प्रशांत करंजीकर, डॉ.उज्ज्वला सोमवंशी, डॉ.अनिलकुमार कांबळे, डॉ.नितीन तांबोळी, डॉ.संघर्ष श्रृंगारे हे करत आहेत. कार्यक्रमाच्या सुरुवातील कु. अंकिता अक्कनगीरे या विद्यार्थीनीने स्वागत गीत सादर केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिमखाना उपाध्यक्ष डॉ.ज्योती देशमुख यांनी केले तर आभार डॉ. विजय भामरे यांनी मानले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.व्यंकट जगताप, डॉ.संतोष कांबळे, डॉ. अनंत शिंदे,डॉ.राजेश शेळके, डॉ.पद्माकर वाडीकर,डॉ. दयानंद मोरे, डॉ.सुनिता मगर, श्री.भगवान कांबळे, डॉ.विनोद शिंदे, डॉ. ज्ञानेश्वर सुरडकर व श्री.राहुलदेव भवाळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# गाव तिथे बुद्ध विहार अभियान राबविणार : भिक्खू पय्यानंद



लातूर / प्रतिनिधी- आज लातूर शहरांमध्ये सर्वच बुद्ध विहाराच्या माध्यमातून धम्म प्रसाराचे कार्य गतिमान पद्धतीने सुरू आहे. आता ग्रामीण भागामध्ये गाव तिथे बुद्ध विहार हे अभियान राबवून बुद्धाचा धम्म हा लातूर जिल्ह्यामधील सर्व खेड्यापाड्यांपर्यंत पोहोचविण्याचा उपक्रम येत्या काळामध्ये राबविण्याचा मनोदय बौद्ध धम्म प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव तथा धम्म गुरु भिक्खू पय्यानंद थेरो यांनी नुकतेच केले.

दर रविवार चलो बुद्ध विहार या अभियानातर्गत लातूर शहरातील बालाजी नगर येथील राजा शुद्धोधन चॅरिटेबल ट्रस्ट द्वारा संचालित राजा शुद्धोधन बुद्ध विहार येथे सामूहिक बुद्ध वंदना कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता यावेळी ते मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी विचार मंचावर भंते बुद्ध शील आणि भंते विपस्सी यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी तथागत भगवान बुद्ध आणि बोधिसत्व परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर धुप, दीप आणि पुष्पाने विनम्रपणे अभिवादन करण्यात आले.

यानंतर प्रा. देवदत्त सावंत यांनी भिक्खू संघाला याचना केली. त्यानंतर बुद्ध वंदना, धम्म वंदना, संघ वंदना, २२ प्रतिज्ञा वाचन करण्यात आले.

पुढे बोलताना भिक्खू पय्यानंद थेरो म्हणाले की, बौद्ध धम्माच्या प्रसार आणि प्रचार करण्यासाठी भिक्खूची भूमिका महत्त्वाची असते. मात्र भिक्खूसोबत समाजातील अभ्यासू आणि चिकित्सक बौद्ध अनुयायांनी धम्माच्या प्रसारासाठी एकत्र आले पाहिजे यासाठी भविष्यकाळात प्रयत्न करणार असून लातूर जिल्ह्याच्या धम्म चळवळीला अधिक गतिमान केली जाईल. धम्म चळवळ ही अधिक लोकाभिमुख व्हावी यासाठी समाजामध्ये उपासकाची भूमिका महत्त्वाची असते धम्माच्या प्रचारासाठी आपण समाजातील सर्व व्यक्ती, संस्था आणि संघटना यांचे सहकार्य घेणार असल्याचेही ते म्हणाले. आज संपूर्ण समाजाला धम्म विचाराची आवश्यकता आहे कारण धम्मामुळेच व्यक्तीचा व्यक्तिमत्व विकास आणि आपले आचरण समाजाभिमुख होण्यास मदत होते आणि मानवी जीवन हे विशुद्ध बनते असेही ते यावेळी म्हणाले. या कार्यक्रमांमध्ये महात्मा फुले राहुरी कृषी विद्यापीठ, राहुरी येथील डॉ. कैलास कांबळे यांनी महाविहाराला दालमिल दान दिली जाईल याची माहिती देऊन ग्रंथाचा एक संच भिक्खू पय्यानंद थेरो यांच्याकडे सुपूर्त केला तसेच डॉ. मा. ना. गायकवाड यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, प्राचार्य डॉ. संजय गवई, प्रा. देवदत्त सावंत, वसंत वाघमारे, शिलरत्न सोनवणे, विठ्ठल जाधव, सुधाकर कांबळे, ज्योतीराम लामतुरे, राहुल शाक्यमुनी, पांडुरंग अंबुलगेकर, अनिरुद्ध बनसोडे, उदय सोनवणे, सतिश मस्के, शोभा सोनकांबळे, पंचशीला बनसोडे, मिना कदम, शंकूतला नेत्रगांवकर, सरिता बनसोडे, कविता धावारे, सुमन उडानसिंग, बेबीताई कांबळे, दबडे यांच्यासह बालाजी नगर येथील बौद्ध उपासक उपासिका मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. आनंद सोनवणे यांनी केले तर आभार मिलिंद धावारे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी गौतम सूर्यवंशी, सूर्यकांत दांडे, विक्रम चिकाटे, हेमंत जाधव, राजकुमार राऊत, धम्मरत्न सोनवणे, दगडू साळवे, राजकुमार कांबळे, विशाल कांबळे, विनोद धांडे, संघपाल दांडे आदींनी परिश्रम घेतले.

# ऐतिहासिक विजयानंतर टीम इंडियाला मिळाली गुड न्यूज, स्वप्नभंग करणाऱ्या या टीमला धक्का!

मुंबई-भारत विरुद्ध इंग्लंड मालिकेतील तिसऱ्या सामन्यात टीम इंडियाने ४३४ धावांनी दणदणीत विजय मिळवलाय. इंग्लंडचा पराभव करून टीम इंडियाच्या कसोटी क्रिकेटच्या इतिहासातील सर्वात मोठा विजय रोहितसेनेने नोंदवला आहे. रविंद्र जडेजाची ऑलराऊड कामगिरी आणि यशस्वी जयस्वालच्या द्विशतकाच्या जोरावर टीम इंडियाने मालिकेत २-१ ने आघाडी मिळवली आहे. पहिल्या टेस्टमध्ये पराभव स्विकारावा लागल्यानंतर टीम इंडियाने सलग दोन सामने खिशात टाकले. अशातच आता तिसऱ्या कसोटीतील विजयानंतर टीम इंडियाला आणखी एक गुड न्यूज मिळाली आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीपच्या पाईंट्स टेबलमध्ये टीम इंडियाने मोठी झेप घेतली आहे.तिसऱ्या सामन्यातील विजयामुळे भारताला आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२३-२५ पॉइंट टेबलमध्ये दुसऱ्या स्थानावर जाण्यास मदत झाली. सलग दोन विजयानंतर टीम इंडियाने जोरदार मुसंडी मारली. सध्या टीम इंडियाने ७ मॅचमधील ४ विजयामुळे ५० अंक खिशात घातले आहेत. तर अव्वल स्थानी न्यूझीलंडचा संघ विराजमान झालाय. न्यूझीलंडने ४ सामन्यात ३ विजय मिळवले आहेत. तर एका सामन्यात त्यांना पराभव स्विकारावा लागला होता. तर टीम इंडिया दुसऱ्या स्थानी आल्याने टीम इंडियाचा स्वप्नभंग करणाऱ्या ऑस्ट्रेलियाला मोठा धक्का बसलाय. ऑस्ट्रेलिया १० सामन्यातील ६ विजयासह तिसऱ्या स्थानी आहे.टीम इंडियाने २०२१ मध्ये न्यूझीलंडविरुद्धच्या ३७२ धावांचा पराभव करत भारताचा कसोटी क्रिकेटमधील धावांच्या फरकाने त्यांचा सर्वात मोठा विजय होता. आता हाच रेकॉर्ड टीम इंडियाने मोडून काढलाय. तर १९३४ मध्ये ओव्हल येथे ऑस्ट्रेलियाकडून ५६२ धावांनी झालेल्या पराभवानंतर हा पराभव इंग्लंडचा कसोटीतील दुसरा सर्वात मोठा पराभव होता.

टीम इंडिया : रोहित शर्मा (कर्णधार), यशस्वी जयस्वाल, शुबमन गिल, रजत पाटीदार, सरफराज खान, रवींद्र जडेजा, ध्रुव जुरेल (विकेटकीपर), देवदत्त पडीक्कल (सब्स्टीट्यूड), कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद सिराज.

इंग्लंड : बेन स्टोक्स (कॅप्टन), झॅक क्रॉली, बेन डकेट, ऑली पोप, जो रूट, जॉनी बेअरस्टो, बेन फोक्स (विकेटकीपर), रेहान अहमद, टॉम हार्टले, मार्क वुड आणि जेम्स अँडरसन.

# सारकोपेनिया म्हणजे काय...

सारकोपेनिया. वृद्धत्वामुळे कंकाल स्नायूंचे वस्तुमान आणि शक्ती कमी होणे होय.

भयंकर स्थिती आहे

हळूहळू तुमचे कार्यक्षम स्नायू वापरा

१. उभे राहण्याची सवय लावण्यासाठी ... फक्त बसू नका! ... आणि जर तुम्हाला बसता येत असेल तर झोपू नका!

२. वयाच्या ५०-६० नंतर, वजन कमी करणे शक्य नाही, खासकरून जर तुम्ही व्यायाम करत नसाल आणि वजन कमी करण्यासाठी कमी खाण्यावर अवलंबून असाल!

कारण जर सर्व स्नायू गमावले तर ते खूप धोकादायक असू शकते!

३. धावणे, सायकल चालवणे किंवा चढणे यामुळे गुडघा दुखतो का?

जर तुम्ही याआधी कधीही व्यायाम केला नसेल तर तुम्ही तुमच्या मनात फक्त धावणे, बाइक चालवणे किंवा चढणेच करू शकता कारण यामुळे तुमचे गुडघे खूप दुखतील!

पण जर तुमच्याकडे स्नायूंची पुरेशी ताकद असेल आणि हळू हळू धावण्याची, सायकल चालवण्याची आणि चढण्याची सवय लावली तर हा एक चांगला व्यायाम होऊ शकतो आणि तुमच्या गुडघ्यांना दुखापत होणार नाही! तुमचे गुडघे दुखतात की नाही हे तुमच्या स्नायूंच्या ताकदीवर अवलंबून आहे!

४. जर एखादी वृद्ध व्यक्ती आजारी असेल आणि रुग्णालयात दाखल असेल, तर त्याला अधिक आराम करण्यास सांगू नका ... किंवा झोपा आणि आराम करा आणि अंथरुणातून बाहेर पडू नका!

आठवडाभर पडून राहिल्याने कमीत कमी ५% स्नायू कमी होतात!

आणि म्हातारा त्याचे स्नायू परत मिळवू शकत नाही!

५. वडीलधाऱ्यांना घरकाम करू न दिल्याने तुम्ही फिलीअल आहात असे समजू नका आणि मोलकरीण केली तर त्यांना शिव्या द्या!

सहसा, मदतनीस नियुक्त करणारे बरेच वृद्ध लोक स्नायू वेगाने गमावतात!

६. तुम्ही उद्यानात जाता तेव्हा दररोज फक्त एकच क्रियाकलाप करू नका.

जेव्हा आपण आपले पाय देखील हलवू शकता तेव्हा आपले हात हलवू नका. आपण क्षैतिज पट्टी देखील खेचणे किंवा प्रत्येक क्रीडा उपकरणे हलविणे आवश्यक आहे!

कारण जोपर्यंत माणूस हालचाल करतो तोपर्यंत संपूर्ण शरीराचे सर्व स्नायू गुंतलेले असतात!

अपुऱ्या व्यायामामुळे अनेक वृद्धांना गिळण्यास त्रास होतो!

सरतेशेवटी, त्यांना तोंडभर थुंकूनही खोकता आले नाही आणि यामुळे ते मरण पावले!

७. ऑस्टियोपोरोसिस पेक्षा सारकोपेनिया अधिक भयानक आहे!

ऑस्टियोपोरोसिसमुळे तुम्हाला पडणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे, तर सारकोपेनिया केवळ जीवनाच्या गुणवत्तेवरच परिणाम करत नाही तर स्नायूंच्या अपुऱ्या वस्तुमानामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण देखील वाढवते!

८. सारकोपेनियाचा सर्वात जलद तोटा पायांच्या स्नायूमध्ये होतो!

कारण जेव्हा एखादी व्यक्ती बसते किंवा झोपते तेव्हा पाय हलत नाहीत आणि पायांच्या स्नायूंच्या ताकदीवर परिणाम होतो ... हे विशेषतः महत्वाचे आहे!

काळे पाय बनू नका!

त्यामुळे दिवसातून किमान २० ते ३० वेळा स्क्वॅट करा.

स्क्वॅट म्हणजे खाली बसणे नव्हे तर टॉयलेट सीटवर बसल्यासारखे आहे... तुम्ही खुर्ची वापरू शकता आणि जेव्हा तुमची बट सीटला स्पर्श करते तेव्हा उभे राहू शकता!

तैवानच्या प्रगत वैद्यकीय प्रणालीमध्ये आरोग्य विमा देखील आहे परंतु तैवानमधील वृद्ध लोक मृत्यूपूर्वी अंथरुणावर झोपेपर्यंत सरासरी ८ वर्षे व्हीलचेअरवर घालवतात!

आणि आयुष्याची गुणवत्ता इतकी खराब असताना तुम्हाला आठ वर्षांचे म्हातारपण नको आहे!

आपण सारकोपेनियाकडे लक्ष देणे आवश्यक आहे...!



पायऱ्या चढून वर जा... धावणे, सायकल चालवणे आणि चढणे हे सर्व उत्तम व्यायाम आहेत आणि त्यामुळे स्नायू वाढू शकतात!

वृद्धापकाळातील प्रत्येकाच्या चांगल्या दर्जाच्या जीवनासाठी...

हलवा... तुमचे स्नायू वाया घालवू नका!!

वृद्धत्व पायापासून वरच्या दिशेने सुरू होते! तुमचे पाय सक्रिय आणि मजबूत ठेवा...!

ऋजसे आपण वर्षे घालवतो आणि दररोज म्हातारा होत असतो, आपले पाय नेहमी सक्रिय आणि मजबूत असले पाहिजेत.

जसजसे आपण सतत म्हातारे होत असतो / वृद्ध होत असतो, तसतसे आपले केस राखाडी होण्याची (किंवा) त्वचा निस्तेज (किंवा) चेहऱ्यावर सुरकुत्या पडण्याची भीती बाळगू नये.

दीर्घायुष्य, प्रदीर्घ तंदुरुस्त आयुष्याच्या लक्षणांपैकी लोकप्रिय यूएस मॅगझिन प्रिव्हेन्शन द्वारे सारांशित केले आहे, पायाचे मजबूत स्नायू सर्वात महत्त्वाचे आणि आवश्यक म्हणून शीर्षस्थानी सूचीबद्ध आहेत. कृपया दररोज चालत जा.

जर तुम्ही फक्त दोन आठवडे तुमचे पाय हलवले नाहीत तर तुमच्या पायाची खरी ताकद १० वर्षांनी कमी होईल.

फक्त चाला

डेन्मार्कमधील कोपनहेगन विद्यापीठाच्या एका अभ्यासात असे आढळून आले आहे की वृद्ध आणि तरुण, दोन आठवड्यांच्या निष्क्रियता दरम्यान, पायांच्या स्नायूंची ताकद एक तृतीयांश कमकुवत होऊ शकते जे २०-३० वर्षांच्या वृद्धत्वाच्या समतुल्य आहे !!

म्हणून फक्त चाला आमच्या पायाचे स्नायू कमकुवत झाल्यामुळे, आपण नंतर पुनर्वसन आणि व्यायाम केले तरीही ते बरे होण्यास बराच वेळ लागेल.

चालणे. म्हणून चालण्यासारखा नियमित व्यायाम खूप महत्त्वाचा आहे.

ऋसंपूर्ण शरीराचे वजन/भार शिल्लक राहून पायांवर विश्रांती घ्या. पाय हे एक प्रकारचे खांब आहेत, जे मानवी शरीराचे संपूर्ण भार सहन करतात. रोज चाला.

जेची गोष्ट म्हणजे, माणसाच्या ५०% हाडे आणि ५०% स्नायू दोन पायांमध्ये असतात.

चालत जा मानवी शरीरातील सर्वात मोठे आणि मजबूत सांधे आणि हाडे देखील पायांमध्ये असतात.

१० पावले/दिवस मजबूत हाडे, मजबूत स्नायू आणि लवचिक सांधे लोह त्रिकोण बनवतात जो सर्वात महत्वाचा भार वाहतो म्हणजेच मानवी शरीर. ७०% मानवी क्रियाकलाप आणि व्यक्तीच्या जीवनातील ऊर्जा बर्न दोन पायांनी केली जाते.

ऋतुम्हाला हे माहीत आहे का? जेव्हा एखादी व्यक्ती तरुण असते तेव्हा तिच्या मांडीत ८०० किलो वजनाची छोटी गाडी उचलण्याइतकी ताकद असते! पाय हे शरीराच्या हालचालीचे केंद्र आहे. दोन्ही पायांना मिळून मानवी शरीराच्या ५०% नसा, ५०% रक्तवाहिन्या आणि ५०% रक्त त्यामधून वाहत असते. हे शरीराला जोडणारे सर्वात मोठे रक्ताभिसरण नेटवर्क आहे.

म्हणून रोज चाला. फक्त जेव्हा पाय निरोगी असतात तेव्हाच रक्ताचा प्रवाह सुरळीत होतो, त्यामुळे ज्या लोकांच्या पायाचे स्नायू मजबूत असतात त्यांचे हृदय नक्कीच मजबूत असते. चाला. वृद्धत्व पायापासून वरच्या दिशेने सुरू होते. जशी एखादी व्यक्ती मोठी होते, मेंदू आणि पाय यांच्यातील सूचनांच्या प्रसारणाची अचूकता आणि गती कमी होते, ती व्यक्ती तरुण असताना कमी होते. कृपया चालत जा याशिवाय, तथाकथित बोन फर्टिलायझर कॅल्शियम कालांतराने लवकर किंवा नंतर नष्ट होईल, ज्यामुळे वृद्धांना हाडे फ्रॅक्चर होण्याची अधिक शक्यता असते. चाला. वृद्धांमध्ये हाडांचे फ्रॅक्चर सहजपणे अनेक गुंतागुंत निर्माण करू शकतात, विशेषत: मेंदूच्या थ्रोम्बोसिससारखे घातक रोग. तुम्हाला माहीत आहे का की साधारणपणे १५% वृद्ध रूग्ण जास्तीत जास्त मरतात. एक वर्षाच्या आत मांडीचे हाड फ्रॅक्चर !! रोज न चुकता चाला

पायांचा व्यायाम, वयाच्या ६० वर्षानंतरही कधीही उशीर होत नाही. आपले पाय/पाय कालांतराने हळूहळू म्हातारे होत असले तरी, पाय/पायांचा व्यायाम करणे हे आयुष्यभराचे काम आहे. १०,००० पावले चाला केवळ नियमितपणे पाय बळकट केल्याने पुढील वृद्धत्व टाळता येते किंवा कमी करता येते. ३६५ दिवस चाला

तुमच्या पायांना पुरेसा व्यायाम मिळावा आणि तुमच्या पायाचे स्नायू निरोगी राहतील याची खात्री करण्यासाठी कृपया दररोज किमान ३०-४० मिनिटे चाला.

- डॉ. सुनील इनामदार

## संपादकीय

# अपेक्षित निकाल

दोन्ही गटांच्या आमदारांना पात्र ठरवीत सब खूशफकरण्यात विधानसभा अध्यक्ष यशस्वी झाले आहेत. शिवसेनेच्या प्रकरणातही असाच निर्णय त्यांनी महिन्यापूर्वी घेतला होता. तसाच निकाल त्यांनी याही प्रकरणात देत स्वतःला सुरक्षित ठेवले आहे.


राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या दोन्ही गटांनी केलेल्या अपात्रता अर्जाचा निकाल विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी अपेक्षेप्रमाणेच दिला आहे. गेल्या महिन्यात अशाच पद्धतीने शिवसेनेच्या दोन्ही गटांकडून दाखल झालेल्या अर्जावर त्यांनी शिवसेना पक्ष मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचीच असल्याचा निकाल दिला होता आणि दोन्ही गटांचे आमदार पात्र ठरविले होते. आताही नार्वेकर यांनी राष्ट्रवादी पक्ष अजित पवार यांना बहाल केला आहे आणि दोन्ही गटांचे आमरदारही पात्र ठरविले आहेत. गेल्याच आठवड्यात निवडणूक आयोगाने देखील विधिमंडळ पक्षातील बहुमताच्या आधारे पक्ष आणि चिन्ह अजित पवार गटाला दिले होते. त्याच निकालाबरहुकूम विधानसभा अध्यक्षांनी हा निकाल दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने आखून दिलेल्या निकषाप्रमाणे पक्षाची घटना, संघटनात्मक रचना आणि विधिमंडळ पक्षातील बहुमत या तीन निकषांचा विचार करणे अपेक्षित होते. हे लक्षात घेऊन अध्यक्षांनी दोन्ही गटांना आपले म्हणणे मांडण्याची संधी दिली. ३० जून २०२३ रोजी पक्षात दोन गट पडले होते. नेतृत्व रचनेसाठी त्यांनी पक्षसंघटना विचारात घेतली. आम्हीच मूळ पक्ष हीच दोन्ही गटांची भूमिका होती. दोन्ही गटांच्या नेतृत्वाकडून आपणच अध्यक्ष असल्याचा दावा करण्यात आला. त्यामुळे पक्षाचा अध्यक्ष नेमका कोण हे आपण त्या आधारे ठरवू शकत नसल्याचे सांगत विधिमंडळ आणि संसदीय पक्षात बहुमत कोणाकडे हा निकष ग्राह्य धरून राष्ट्रवादी अजित पवारांचा असा निर्णय दिला. विधिमंडळात ५३ पैकी ४५ आमदार अजित पवार गटात आहेत, हा दावा विरोधी शरद पवार गटानेही अमान्य केलेला नाही. ही बाब निकाल देताना विधानसभा अध्यक्षांनी अधोरेखित केली. निवडणूक आयोगाने राष्ट्रवादीतील खासदार, विधानसभा आणि विधान परिषदेतील आमदार यांची एकूण संख्या ८१ असून, त्यापैकी ५% जणांचा अजित पवार यांना पाठिंबा आहे, तर २८ जणांचा शरद पवार यांना पाठिंबा आहे, ही बाब लक्षात घेतली होती. ५ आमदार आणि एक खासदाराने दोन्ही गटांना आपली प्रतिज्ञापत्रे दिली होती. हे सहाजण वगळताही बहुमत अजित पवार गटाकडे आहे हे लक्षात घेऊन खरा पक्ष अजित पवार यांचाच असल्याचा निकाल दिला होता.

**सर्वोच्च न्यायालयात आव्हान–** निकाल देताना विधानसभा अध्यक्षांनी घाऊक पक्षांतराला रोखण्यासाठी करण्यात आलेला पक्षांतर बंदी कायद्याचा विचार केलेला नाही. पक्षातील आयाराम–गयाराम पद्धत रोखण्यासाठी जो कायदा करण्यात आला तोच लक्षात न घेता अध्यक्षांनी १० व्या परिशिष्टाचा विचारच केलेला नाही. महिनाभरापूर्वी शिवसेनेबाबत निकाल देतानाही या दहाव्या परिशिष्टाकडे अध्यक्षांनी डोळेझाक केलेली आहे. पक्षांतर्गत मतभेद म्हणजे कायद्याचा भंग नव्हे किंवा पक्षातील नाराजी म्हणजे विधिमंडळ पक्षाची नाराजी नव्हे. आमदारांची भूमिका ही पक्षांतर्गत बाब असून, पक्षाच्या अध्यक्षाच्या मनाविरुद्ध बहुमताने एखादा निर्णय घेणे म्हणजे पक्षातून बाहेर पडणे नव्हे, अशी निरीक्षणे विधानसभा अध्यक्षांनी नोंदवली आहेत. पक्षाच्या अध्यक्षांनी पक्षातील सदस्यांचा बहुमताने घेतलेल्या निर्णयाचा आदर केला पाहिजे, दहाव्या परिशिष्टाचा गैरवापर करू नये, अशीही निरीक्षणे त्यांनी नोंदवली आहेत. पक्षाच्या घटनेची दोन्ही गटांनी पायमल्ली केली असे निवडणूक आयोगाच्या निकालात म्हटले होते आणि केवळ बहुमत कोणाकडे याचा आधार घेत पक्ष अजित पवार यांना दिला. या निकालास राष्ट्रवादी पक्षाच्या शरद पवार गटाने तातडीने आव्हान देत स्थगिती मिळवली असती तर कदाचित निकाल वेगळा लागू शकला असता हे विधिज्ञ उज्ज्वल निकम यांचे मत विचारात घेण्यासारखे आहे. आता विधानसभा अध्यक्षांच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले जाणार आहे; मात्र राष्ट्रवादी पक्ष ज्यांनी स्थापन केला त्या शरद पवारांच्या हातून पक्ष सध्यातरी निसटला आहे. गेले ८ महिने राष्ट्रवादीत सुरू असलेल्या या नाट्यावर या निकालाने अद्याप तरी पडदा पडलेला नाही. सर्वोच्च न्यायालयातच याचा अंतिम फैसला होईल.

**ज्यांच्या शोधामुळे जगाची जगण्याची दिशा बदलली असे जागतिक कीर्तीचे थोर शास्त्रज्ञ यांची नवीन अभ्यासू पिढीला माहिती व्हावी व त्याद्वारे प्रेरणा मिळावी या हेतूने संक्षिप्त स्वरुपात दरदिवशी किंवा सोईप्रमाणे एका शास्त्रज्ञांची माहिती आम्ही प्रकाशित करीत आहोत. यासंदर्भात आपली प्रतिक्रिया आपेक्षित आहे.**

– संपादक **यशवंत** लातूर

## सतीश धवन २८



भारतीय अवकाश आयोगाचे अध्यक्ष म्हणून ज्यांनी फार मोठी कामगिरी बजावली अशा श्री. सतीश धवन यांचा जन्म २५ सप्टेंबर १९२० या दिवशी झाला. लाहोर विद्यापीठातून त्यांनी गणित आणि पदार्थ विज्ञानात बी.ए. ची पदवी मिळविली नंतर इंग्रजी वाङ्मयात एम.ए. करून त्यांनी यंत्र अभियांत्रिकीत बी.ई. पदवी मिळविली. पुढे अमेरिकेतील विद्यापीठातील एम.एस. पदवी घेऊन त्यांनी एरोनॉटिकल इंजिनिअरिंगमध्ये डॉक्टरेट मिळवली.त्यानंतर १९५१ मध्ये बंगलोर येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये वरिष्ठ वैज्ञानिक म्हणून ते रुजू झाले. एरोनॉटिक इंजिनिअरिग विभागाचे प्राध्यापक आणि प्रमुख बनले. भारतात श्रवणातीत वेगाने उडणाऱ्या विमानांच्या प्रतिरूप चाचणीसाठी श्री. धवन यांनी सर्वप्रथम वात बोगदे तयार केले. हा पहिला श्रवणातीत वात बोगदा दुसऱ्या महायुद्धात वापरलेल्या एका डकोटा जातीच्या विमानातील हवेच्या टाक्या वापरून त्यांनी तयार केला होता. पुढे या तंत्रात त्यांच्या मार्गदर्शनाखाली खूप प्रगती झाली. धवन यांनी वायुगतिकी क्षेत्रामध्ये संशोधन सुरू केल्यानंतर त्यांचे संशोधन खूप गाजले. त्या काळात श्रवणातीत लहरी आणि धक्का लहरींवरील संशोधन हे 'नवे विश्व' मानले जात होते. धवन यांनी या नव्या आव्हानात्मक विषयामध्ये संशोधन सुरू केले. एखाद्या घन पृष्ठभागावरून धक्का लहरी कशा परावर्तित होतात, याबाबतचे त्यांचे संशोधन पथदर्शक ठरले. धवन यांना भारतातील प्रायोगिक वायुगतिकीचे जनक म्हणण्यात येते. त्यांच्या संशोधनाची काही तत्त्वे होती. शक्यतो कमी खर्चात अनावश्यक फापटपसारा टाळून व भारतीय साधने वापरून ते प्रयोग करीत असत. शिवाय उगीच भाराभर प्रयोग करण्याचे टाळून सद्य परिस्थितीत तो प्रयोग किती व कुणाला उपयुक्त ठरणार आहे, हे बघूनच प्रयोग सुरू केला जात असे. त्यांच्या प्रयत्नांमुळेच आशियायी देशातील वायुगतिकी (फ्युईड डायनॉमिक्स) क्षेत्रातील संशोधकांची पहिली शास्त्रसभा १९८० साली बंगलोर येथे आयोजित करण्यात आली होती.

१९७२ साली धवन यांना अवकाश आयोगाचे अध्यक्षपद मिळाले. त्यांच्या कारकीर्दीतील पहिल्या दहा वर्षांच्या काळात खेड्यापाड्यांतून शिक्षण नेणारा 'साईट' कार्यक्रम राबविण्यात आला.

'इन्सेंट' कार्यक्रमाची सुरूवात झाली. उपग्रह बनविण्याबरोबरच उपग्रहबाहक अग्निबाणांची निर्मिती सुरू झाली. 'आर्यभट', 'रोहिणी' असे उपग्रह प्रक्षेपित केले गेले. धवन यांचा अवकाश कार्यक्रम हा समाजोपयोगी होता. हवामान, नैसर्गिक संपत्तीसाठी सर्वेक्षण, दळणवळण अशा कार्यासाठी उपयुक्त उपग्रहांचे प्रक्षेपण त्यावेळी भारताने केले.भारतीय अवकाश कार्यक्रमाचे प्रमुख म्हणून काम करताना ते फक्त एक रुपया एवढा नाममात्र पगार दरमहिना घेत. त्यांनी 'पक्ष्याचे उड्डाण' हे पुस्तक लिहिले. १९८१ मधील 'पद्मभूषण' पुरस्कारासहित त्यांना अनेक सन्मान प्राप्त झाले.असे हे थोर शास्त्रज्ञ ३ जानेवारी २००२ मध्ये काळाच्या पडद्याआड गेले.

# समाजसुधारक महर्षी विठ्ठल रामजी शिंदे

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे


स्वातंत्र्यलढ्यात १९३० हे वर्ष महाराष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात देशभराचा शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणात सामील झाला होता. स्वातंत्र्यसैनिक बाळूकाका कानिटकर व हरिभाऊ पाठक यांनी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, जे समाजसुधारक आणि अध्यात्मिक असे होते, तसेच अस्पृश्यता निवारणासाठी आपले आयुष्याचे योगदान देत होते, त्यांना एप्रिल १९३० मध्ये भेटून कायदेभंग चळवळीत पुढारीपण घेण्याची विनंती केली. विठ्ठल रामजी शिंदे यांच्या मनात महात्मा गांधींबद्दल आत्यंतिक आदर होता. त्यांनी कायदेभंग चळवळीमध्ये सहभागी होऊन पुणे जिल्ह्यात खेडोपाडी पायी दौरा केला. केशवराव जेधे हे देखील या कायदेभंग आंदोलनाच्या चळवळीत सामील झाले.

१९३० च्या चळवळीचे वैशिष्ट्य असे की, या चळवळीत ग्रामीण समाजाचा प्रतिनिधी वर्ग मोठ्या प्रमाणात तुरुंगात गेला. हे साधे तुरुंगामध्ये जाणे नव्हते, तर स्वातंत्र्याच्या चळवळीचे व्रत स्वीकारणे होते. निश्चेष्ट पहुडलेल्या समाजातून ही स्वातंत्र्य चळवळ अचानक फोफावण्यामध्ये लोकमान्य टिळकांनी व इतरांनी अनेक वर्षे तन–मन–धनाने स्वातंत्र्यलढ्यासाठी चालविलेल्या चळवळीचा समाजमनावर झालेला अप्रत्यक्ष परिणाम महत्त्वाचा ठरला; पण महाराष्ट्राबद्दल बोलायचे झाले, तर हा जो ग्रामीण समाज हलला त्याचे बरेचसे श्रेय महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आणि केशवराव जेधे यांचे आहे. या दोघांच्या सहभागाने विशेषतः ग्रामीण भागातील तरुणांमध्ये स्वातंत्र्यलढ्यात भाग घेण्यामध्ये प्रचंड उत्साह निर्माण झाला.

१९३० चा स्वातंत्र्यसंग्राम जसा अधिक लोकाभिमुख आणि शक्तिशाली बनू लागला, तसतसे ब्रिटिश सत्ताधारी बेचैन झाले. या संग्रामाविरुद्ध लोकांतून काही संघटना उभी राहते का पाहावे, म्हणून ब्रिटिश सत्तेने वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळे मार्ग शोधण्याचे प्रयत्न केले. कधी नोकऱ्यांची आशा दाखवली. कधी पदव्यांचा लोभ दाखवला; पण वातावरण मूलगामी इतके प्रक्षोभक बनलेले होते की, तरुण पिढी असा प्रयत्न करणाऱ्यांना वेगवेगळे प्रश्न विचारू लागली. १९४२ च्या 'चले जाव' चळवळीचे बीज १९३० च्या असहकार चळवळीमध्ये निर्माण झाले होते.

विठ्ठल रामजी शिंदे यांनी पुणे जिल्ह्यात खेडोपाडी पायी दौरा काढला. त्यांच्या पथकाबरोबर हरिभाऊ पाठक, हरिभाऊ तुळपळे, पोपटलाल शहा ही मंडळीही जात. या दौर्याचा खेडोपाडी व्याख्यान, पोवाडे यामुळे परिणाम झाला, तसेच खेडेगावातील या मंडळींनी आपोआपच न सांगता जागोजागी जेवणखाण इत्यादी सोय स्वयंस्फूर्तीने केली. विठ्ठल रामजी शिंदे आठवड्याच्या शेवटी पुण्यास परत येऊन पुन्हा सोमवारी दौर्यावर जात. पुण्यात मुक्कामी असताना पुण्याहून बाहेरगावी ठिकठिकाणी जाणाऱ्या सत्याग्रही तुकड्यांना निरोप देण्याचे समारंभ त्यांच्या अध्यक्षतेखाली अनेकवेळा होत असे. त्यावेळी त्यांच्या पत्नी रखमाबाई शिंदे यापण सत्याग्रह्यांना नारळ व आशीर्वाद देत.

बाळूकाका कानिटकर यांच्या वाड्यात विठ्ठल शिंदे, तात्यासाहेब केळकर, हरिभाऊ फाटक, हरिभाऊ तुळपुळे, संगमनेरचे रामकृष्णदास वगैरेंची बैठक होऊन महाराष्ट्रात जंगल सत्याग्रह काढण्याचे ठरले.



प्रभातफेरी जशी पुण्याने चालू केली, तशीच जंगल सत्याग्रहाची कल्पना पुण्यानेच उचलून धरली व ती सबंध बृहन्महाराष्ट्रभर कालांतराने वणव्याप्रमाणे पसरली. बाळूकाका कानिटकर यांनी हजार सत्याग्रही निरनिराळ्या युद्धक्षेत्रावर पाठवल्यानंतर त्यांना ३० एप्रिल १९३० रोजी सरकारने पकडले.


विठ्ठल रामजी शिंदे यांनी एप्रिल महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात हवेली तालुक्याचा दौरा केला. सत्याग्रहाचा मोठा झेंडा, बाजाची पेटी, टाळ आणि प्रभातफेरीची पद्यावली यांसह पुण्याच्या हद्दीवर फर्ग्युसन कॉलेजच्या समोर प्रथम झेंडावंदन करून सुरुवात झाली. दुसरा दौरा खेड तालुक्यात, तिसरा दौरा भीमाशंकर व त्यांच्या पलीकडील भागात झाला. या दौर्यांमध्ये प्रथम मीठ विकण्याचा कायदेभंग सुरू झाला. दांडी येथून मिठाची मडकी आणण्यात आली होती. केव्हा केव्हा मिठाचा लिलाव होऊन पैसे जमत. सभेतील व्याख्यान संपल्यावर विदेशी कापडाची होळी होत असे. उत्साहाच्या भरात लहान लहान मुले आपल्या डोक्यावरील मौल्यवान विदेशी टोप्या होळीत टाकीत. त्यात काही सरकारी अधिकाऱ्यांची मुले आपल्या वडिलांच्यादेखत आपल्या टोप्या फेकीत. ५–% हजारांचा जमाव सहज जमत असे. लोकांना विठ्ठल रामजी शिंदे यांच्या कायदेभंग चळवळीच्या दौर्याचे आकर्षण होते. हा दौरा म्हणजे धार्मिक वारकऱ्यांची एक दिंडीच झाली होती. या दौर्याने महाराष्ट्रभर खळबळ उडवून दिली होती. १२ मे १९३० रोजी विठ्ठल रामजी शिंदे यांना पुणे येथे त्यांच्या घरी अटक करण्यात आली. प्रवासाच्या पिशवीसह ते निघाले तेव्हा त्यांच्या पिशवीत वाचनाची पुस्तके व जरुरीचे कपडे, तसेच भगवद्गीता, धम्मपद, बायबल, सुलभसंगीत, चष्मा, विंचरण्याचा कंगवा इतके त्यांचे सोबती कोठेही बरोबरच असणारे असे होते. विठ्ठल शिंदे यांचे बालपणाचे स्नेही डेप्युटी कलेक्टर माधवराव हुल्याळ यांना पुढे ११% कलमाखाली गुन्ह्याला चिथावणी व कलम ४% खाली बेकायदेशीर मिठाची विक्री या आरोपाखाली सहा महिने सक्तमजुरीची शिक्षा झाली. खटल्याचा फार्स संपल्यावर विठ्ठल रामजी शिंदे मित्र या नात्याने मॅजिस्टेट हुल्याळ यांच्या पत्नीस भेटले. त्यांच्या पत्नीचे डोळे अश्रूंनी भरले होते. ते त्यांना विनोदाने म्हंटले, तुमच्या पतीचा मी कैदी असून आपण अश्रू गाळता? एक अंजीर त्यांच्याकडे खाऊन पाणी पिऊन ते मोटारीत बसले आणि सायंकाळी % वाजता येरवडा तुरुंगात दाखल झाले. तिसऱ्या वर्गाचा सक्तमजुरीचा कैदी म्हणून त्यांना झोपावयाला जाडेभरडे तरट व पांघरावयाला तसेच कांबले देण्यात आले. ना उशी, ना चादर. पुढे १५ दिवसांनी 'बी' क्लास मिळाल्यावर चांगल्या भागात त्यांना हलविण्यात आले ज्या ठिकाणी पुढे महात्मा गांधी वगैरे मोठ्या पुढाऱ्यांनाही याच भागात ठेवण्यात आले होते. 'बी' क्लासच्या सक्तमजुरीच्या कैद्यांना काथ्याची जुनी तरटे उकलने आणि उकललेल्या काथ्यांची पुन्हा नवीन दोरखंड बनवणे हे काम सकाळी % ते १० व दुपारी १२ ते ४ पर्यंत असे % तास असे. 'सी' क्लासला बाहेरची कष्टाची कामे करावी लागत व धट्याकट्या माणसांना चक्की मिळे. एक महिन्यानंतर त्यांना लेखनसाहित्य सारखी–सारखी मागणी केल्यावर मिळाले. दिवा नसलेल्या खोलीत त्यांची जवळपास अडीच महिन्यानंतर २४ जुलै रोजी दिव्याची व्यवस्था करण्यात आली. त्यांना दिव्याच्या प्रकाशाकडे बघून इतका आनंद झाला की, त्या दिवसापासून ते रोजनिशी व बालपणीच्या आठवणी लिहू लागले.

विठ्ठल रामजी शिंदे हे साहित्यिक होते. तरुण वयात त्यांनी कादंबरी लिहिण्याचा प्रयत्न केला. त्यांनी रचलेला महात्मा फुलेंचा पोवाडा प्रसिद्ध आहे. कारागृहात त्यांनी माझ्या आठवणी व अनुभव हा ग्रंथ लिहिला. तसेच अस्पृश्यतेचा प्रश्न हा प्रबंध लिहिला.

१४ ऑक्टोबर १९३० रोजी त्यांची तुरुंगातून सुटका करण्यात आली. दुसऱ्या दिवशी रे मार्केटात जाहीर सभा भरवून विठ्ठल रामजी शिंदे यांचे अभिनंदन करण्यात आले. शेवटी त्यांच्या गळ्यात हार घालण्यात आला तेंव्हा ते म्हणाले... आता कायदेभंग करून तुरुंगात जाणे ही इतकी सामान्य गोष्ट झाली आहे की, अशा माळा तुरुंगातून परत आलेल्यांच्या गळ्यात न घालता त्या तुरुंगात न गेलेल्यांच्या गळ्यात घातलेल्या बऱ्या! एवढी व्यापक असहकार चळवळ विठ्ठल रामजी शिंदे यांच्या सहभागाने सहा महिन्यात उभी राहिली होती. तुरुंगात जाणारे लोक परत येत होते. नवे लोक तुरुंगात जात होते. १९३१ मध्ये हिंदुस्थानच्या राजकारणातील एक महत्त्वाची घटना घडली. महात्मा गांधी व सर्व राजबंद्यांची मुक्तता झाली. लॉर्ड आयर्विन यांनी महात्मा गांधी यांना भेटीचे निमंत्रण दिले. चर्चेच्या अंती महात्मा गांधी व लॉर्ड आयर्विन यांच्यात जो करार झाला, तो हिंदुस्थानच्या राजकीय चळवळीचा फार मोठा विजय ठरला.

–गाऊ त्यांना आरती : शिरीष चिटणीस

## राशी भविष्य



दि.**१९ फेब्रुवारी २०२४**

.........................

मेष : आर्थिक लाभाच्यादृष्टीने दिवस चांगला आहे. प्रॉपर्टी, वाहन खरेदी यासाठीही दिवस चांगला आहे. मित्रांचे सहकार्य लाभेल. आरोग्य उत्तम राहील. शासकीय कामांत यश मिळेल. नातेवाईकांचे सहकार्य लाभेल. पाहुणे येण्याची शक्यता आहे.

वृषभ : प्रॉपर्टी, फ्लॅट, वाहन खरेदीसाठी तसेच प्रवासासाठी आजचा दिवस चांगला आहे. तुमच्या कौटुंबिक व नोकरीच्या ठिकाणी जबाबदारीत वाढ होणार आहे. तुमचे निर्णय योग्य ठरतील. काहींच्या जीवनात बौद्धीक परिवर्तनाचे योग आहेत. नवा मार्ग दिसेल.

मिथुन : बौद्धीक क्षेत्रातील व्यक्तींना विशेष यश मिळेल. मात्र प्रवास शक्यतो टाळावेत. एखादी मानसिक चिंता राहील. काहींना हितशत्रूंचा त्रास होण्याची शक्यता आहे. शासकीय कामे यशस्वी होतील. आपल्या मतांमध्ये व विचारांमध्ये बदल करावा लागेल. धोरण बदलावे लागेल.

कर्क : व्यवसाय वाढेल. खरेदीसाठी, प्रॉपर्टी, वाहन खरेदी व गुंतवणूक व नव्या कामाच्या शुभारंभासाठी दिवस चांगला आहे. नोकरीत वरिष्ठांचे सहकार्य लाभेल. सार्वजनिक कार्यात प्रतिष्ठा लाभेल. शत्रूपिडा नाही.

सिंह : व्यवसायाच्या दृष्टीने आपल्याला आजचा दिवस प्रगतीचा ठरणार आहे. आर्थिक लाभ मनासारखे होतील. प्रॉपर्टी, वाहन खरेदी व इतर खरेदीसाठीही आजचा दिवस चांगला आहे. बौद्धीक क्षेत्रातील व्यक्तींना विशेष यश मिळेल. नवीन परिचय व भेटीगाठी होतील.

कन्या : प्रवास शक्यतो टाळावेत. बौद्धीक क्षेत्रातील व्यक्तींना विशेष यश मिळेल. धार्मिक व सांस्कृतिक समारंभात सहभागी होण्याची संधी मिळेल. नोकरी–व्यवसायात समाधानकारक स्थिती राहील. मित्र व थोरा–मोठ्यांच्या आश्वासनांवर अवलंबून राहू नये. संततीसंदर्भात एखादी चांगली घटना घडेल.

तूळ : मनोबल व उत्साह वाढेल. प्रवासाचे योग आहेत. खरेदीकरिता दिवस चांगला आहे. कला, संगीत, नाट्यक्षेत्रातील व्यक्तींना विशेष यश मिळणार आहे. कौटुंबिक जीवनात समाधानाचे वातावरण राहील. आर्थिक क्षेत्रात सुसंधी लाभेल. नवे स्नेहसंबंध जुळतील.

वृश्चिक : कौटुंबिक जीवनात आजचा दिवस आनंदा ठरणार आहे. विवाहेच्छुकांचे विवाह ठरण्याची शक्यता आहे. नातेवाईकांचे विशेष सहकार्य लाभेल. आरोग्याकडे लक्ष ठेवावयास हवे. पत्नीसाठी खर्च करावा लागेल.

धनू : आर्थिक लाभाच्यादृष्टीने आजचा दिवस तुम्हाला विशेष लाभदायक ठरणार आहे. उधारी उसनवारी वसुल होईल. व्यवसायात धाडस करावयास हरकत नाही. साडेसाती चालू आहेच, परंतु तुम्ही अडचणींवर मात करणार आहात. तुम्ही आपल्या मतांबद्दल आग्रही राहणार आहात.

मकर : एखादी भाग्यकारक घटना घडेल. प्रवासाचे योग येतील. तुमच्या कार्यात तुम्हाला सुसंधी मिळणार आहे. हाती घेतलेली कामे मार्गी लागतील. कर्मचारी गडी माणसे, नोकर–चाकर यांचे उत्तम सहकार्य लाभेल. व्यवसायात धाडस करणेस हरकत नाही. अनेकांचे सहकार्य लाभेल.

कुंभ : आजचा दिवस अत्यंत उत्साहाचा ठरणार आहे. कला, संगीत, नाट्य क्षेत्रातील व्यक्तींना विशेष सुसंधी मिळेल. कौटुंबिक सौख्य लाभेल. शासकीय कामात यश लाभेल. आर्थिक क्षेत्रातही मनासारखी आवक राहील. मनोबल वाढेल. तुमच्या मतांचा व विचारांचा प्रभाव पटेल.

मीन : मनोबल व आत्मविश्वास वाढेल. वैवाहिक जीवनात मतभेदाची शक्यता आहे. तसेच भागीदारी व्यवहारातही काही अडचणी निर्माण होतील. प्रॉपर्टीचे व्यवहार पुढे ढकलावेत. खर्च वाढतील. मनोरंजनाकडे कल वाढेल. आर्थिक व्यवहारात शक्यतो धाडस टाळावे.

१८ फेब्रुवारीला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर मंगळ, नेपच्यून व त्यानंतर सुर्याचा अधिकाधिक प्रभाव आहे. तुमचे निर्णय तुम्ही साधकबाधक विचार करीत बसण्यापेक्षा अंतःस्फूर्तीने घेता. भविष्याची स्वप्ने रंगवायला तुम्हाला आवडते. तुमच्याकडे प्रचंड आत्मविश्वास असतो. कुठल्याही प्रकारचा संकुचितपणा तुम्हाला आवडत नाही. भ्रष्टाचाराविषयी तुम्हाला प्रचंड चीड असते. त्याविरूध्द उभारलेल्या आंदोलनात तुम्ही आघाडीवर असता. नेतृत्वाचे गुण तुमच्या अंगी जन्मजात असतात. संकटकाळातही तुमचे मनोबल कमी होत नाही. कोणत्याही अडथळ्यावर मात करून ध्येयांच्या दिशेने वाटचाल करता.

भावनेच्या भरात निर्णय घेणे तुम्ही टाळायला हवे. व्याक्तिंगत स्वार्थापेक्षा इतरांची दु:खे दूर करण्यासाठी केलेली आंदोलने यशस्वी ठरतील. नीतिमूल्ये प्रत्यक्षात आणताना पाय जमिनीवर पक्के ठेवा. अतिश्रम टाळायला हवेत. क्रोधालाही आवर घालायला शिका. नाहीतर उच्च रक्तदाब, हृदयविकारासारखी दुखणी उद्भवतील.

कार्यक्षेत्र : प्रशासकीय कौशल्य व सुजाण व्यवस्थापनाचे कसब या तुमच्या जमेच्या बाजू आहेत. लोकसेवा आयोगाच्या परीक्षाद्वारे शासनाची पोलिस, संरक्षणदल किंवा प्रशासकीय खात्यात तुम्हाला चटकन प्रवेश मिळू शकेल. आपल्या साहसी वृत्तीने तेथे तुम्ही झपाट्याने प्रगती करून घ्याल. राजकीय क्षेत्रात तुमचा नावलौकीक लवकर होईल. सक्रीय राजकारणात भाग घ्या. वैद्यकिय क्षेत्र, डोळ्यांचे दवाखाने, छायाचित्रण, रत्नांचे व्यापार ही क्षेत्रेही अनुकूल आहेत.प्रणयी जीवन : तुमचा जोडीदार तुमच्या सारखाच सामाजिक बांधिलकी असलेला असावा अशी तुमची अपेक्षा असते. तुमचा स्वभाव दिलदार असल्याने खोट्या मनोवृत्तीच्या, कंजूष स्वभावाच्या व्यक्ती तुम्हाला पसंत पडत नाहीत. तुमच्या प्रेमळ स्वभावाला जोडीदारानेही तितकाच उत्कट प्रतिसाद द्यावा अशी तुमची अपेक्षा असते. जानेवारी २० ते फेब्रुवारी १८ दरम्यानच्या ६, १५, २४ तारखेच्या व्यक्तींकडून ही अपेक्षा पुर्ण होईल.

वर्षफळ : वर्षभर आर्थिक परिस्थिती उत्तम राहील. व्यावसायीक प्रगती थोड्या मंद गतीने आली तरी स्थायी स्वरूपाची राहील.

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, धाराशीव कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ९८०२२८२४०(अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही) संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** ईमेल : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

# रयतेचा जाणता राजा



महाराष्ट्राचे आराध्य दैवत, सर्वांचे स्फूर्तिस्थान आणि रयतेचा जाणता राजा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. शिवाजी महाराजांचा इतिहास माहीत नाही असा एक ही व्यक्ती राज्यात शोधून ही सापडणार नाही. आपल्या राज्यातच नाहीतर देशातील अनेक राज्यात व जगातील काही देशांत शिवाजी महाराजांचे कार्य अनेकांना स्फूर्ती व प्रेरणा देत असते. शिवाजी महाराजांकडे इतर साम्राज्यांच्या तुलनेत छोटी पण सुसज्ज आणि शिस्तबद्ध अशी फौज होती. या फौजेमध्ये मुख्यत्वे मराठा आणि कुणबी जातीचे मावळे समाविष्ट होते. शिवाजी महाराज जाणून होते की मुघलांच्या प्रचंड दारुगोळा व तोफखान्यांनी सज्ज असलेल्या फौजेला पारंपारिक युद्धपद्धतीने हरवणे कठीण होते. त्यामुळे महाराजांनी आपली स्वतःची अशी युद्धनीती विकसित केली, ज्यास 'गनिमी कावा' म्हणून ओळखले जाते. आजूबाजूच्या भौगोलिक प्रदेशाची माहिती आणि येथील दऱ्याखोऱ्यांचे सखोल ज्ञान यावर वेगवान फौज आणि शत्रूला अनपेक्षित हल्ले अशा पद्धतींचा वापर शिवरायांनी केला. ही युद्धनीती अतिशय यशस्वी ठरली. मुघलांच्या मोठमोठ्या फौजा शिवरायांच्या छोटेखानी फौजांसमोर निष्प्रभ ठरल्या. शिवाजी महाराजांच्या गनिमी कावाचा अनेक इतिहास संशोधक आजही अभ्यास करतात, यावरून शिवरायांची युद्धनीतीचे महत्व अधोरेखित होते.

पारतंत्र्याच्या काळात स्वतःचे राज्य निर्माण करण्याचे स्वप्न पाहणे आणि पाहिलेले स्वप्न पूर्णत्वास नेणे ही काही सोपी गोष्ट नव्हती. पण शिवाजी महाराजांनी सवंगडी असलेल्या मावळ्यांना सोबत घेऊन श्री चे राज्य निर्माण केले आणि इतिहास घडविला. एक आदर्श राजा कसा असतो ? आज्ञाधारक पुत्र कसा असावा ? रयतेचा जाणता राजामध्ये कोणते गुण असावेत ? याचे उत्तम उदाहरण म्हणून आपण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन चरित्राकडे पाहतो. सोळाव्या शतकात होऊन गेलेले राजे शिवाजीचे कार्य आज एकविसाव्या शतकात देखील तेवढेच प्रेरक आणि मार्गदर्शक ठरतात. त्यांनी आपल्या जीवनात अनेक चढ-उतार पाहिले, सुखदुःखाचा अनुभव घेतला, जवळच्या व्यक्तीचा विरह सहन केला, अनेक लढाया त्यांनी आपल्या बुद्धीचातुर्य व सहकार्याने जिंकले आहेत.

शहाजी भोसले आणि राजमाता जिजाऊ यांच्या पोटी पुणे जिल्ह्यातील जुन्नर शहराजवळील वसलेल्या शिवनेरी या डोंगरी किल्ल्यावर १९ फेब्रुवारी १६३० रोजी एका तेजस्वी बाळाचा जन्म झाला. शिवनेरी किल्ल्यात जन्म झाला म्हणून त्या बाळाचे नाव शिवाजी असे ठेवण्यात आले. एका आख्यायिकेनुसार शिवनेरी गडावरील शिवाई देवीला जिजाबाईंनी आपल्याला बलवान पुत्र व्हावा अशी प्रार्थना केली होती म्हणून या मुलाचे नाव 'शिवाजी' ठेवले गेले. शिवरायांचे वडील शहाजीराजे भोसले हे मराठा सेनापती होते, ज्यांनी दख्खनच्या सल्तनतची सेवा केली होती. शहाजी महाराजांना नेहमी एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी जावे लागत असे त्यामुळे त्यांनी राजमाता जिजाऊ आणि बाळ शिवाजी यांची राहण्याची व्यवस्था पुण्यात केली. राजमाता जिजाऊ यांच्या सान्निध्यात चंद्रकलेप्रमाणे बाळ शिवाजी मोठे होत होते. राजमाता जिजाऊ ह्या एक धाडसी आणि स्वाभिमानी स्त्री होती. त्यामुळे त्यांनी बाळ शिवाजीला लहानपणापासून साहसी व धाडसी लोकांच्या कथा व गोष्टी सांगत असत. प्रत्येक महत्त्वाच्या प्रसंगी त्यांना जिजाबाईंनी खंबीर मार्गदर्शन दिले शिवाजी महाराजांच्या त्या आद्यगुरू मानल्या जातात. हिंदवी स्वराज्य स्थापनेचे स्वप्न साकार करायला शिवाजी महाराजांना जिजाबाईंनी स्फूर्ती दिली असे काही इतिहासकार मानतात. मुलांना संस्कारी व धाडसी करायचे असेल तर प्रत्येक स्त्रियांनी राजमाता जिजाऊ यांचे जीवन चरित्र डोळ्यासमोर ठेवायला हवे. लहान मुलांना आई जसे शिकवेल तसे ते मूल घडत राहते. म्हणून जीवनात येणारे सुख, दुःख, सोपे, अवघड, कठीण प्रसंगाचे अनुभव लहान मुलांना द्यायला हवे. पण आजकालच्या माता स्वतः अनेक कष्ट व दुःख सहन करतात पण आपल्या लेकराला काडीचा त्रास होऊ देत नाहीत. त्यामुळे त्यांच्यामध्ये त्या विषयीच्या जाणिवा निर्माण होत नाहीत. माता जिजाऊ यांनी आपले स्वतःचे एक राज्य असावे अशी मनोमन इच्छा होती, तशी ती आपली इच्छा त्यांनी शिवाजी महाराजांकडे व्यक्त केली. त्यासाठी त्यांनी बाळ शिवाजीला घोड्यावर बसणे, तलवार चालविणे यासारख्या युद्धकला शिकविल्या. आपल्यापेक्षा मोठ्या लोकांसोबत कसे वागावे ? महिलांसोबत आपले वर्तन कसे असावे ? जीवनातल्या सूक्ष्म घटनांचा त्यांच्या बालमनावर संस्कार केले. याच विचारातून शिवाजी महाराजांनी आपल्या बाळ सवंगड्यासह रायरेश्वराच्या मंदिरात स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली. खरोखरच तो किती धाडसी निर्णय होता. आपल्या मावळ्यांच्या सहकार्याने वयाच्या अवघ्या १६ व्या वर्षी शिवरायांनी तोरणा किल्ला जिंकून घेतला. पुढील दोन वर्षात शिवरायांनी पुण्याजवळील अनेक महत्त्वाचे किल्ले ताब्यात घेतले. तसं बघायला गेलं तर शत्रू पक्षात कितीतरी सैनिक होते आणि त्यामानाने राजे शिवाजी यांच्याकडे फार तुल्यबळ सैन्य. पण शिवाजी महाराज आणि त्यांचे मावळे सैन्य यांच्यात जो आत्मविश्वास आणि धमक होती ती शंभर सैनिकाला पुरून उरणारी होती. म्हणूनच त्यांनी अनेक किल्ले जिंकू शकले. त्यांच्या मावळ्यांच्या यादीत सारेच शूर आणि वीर होते. त्यापैकी काही शूर वीर मावळ्यांचा सेनापतीचा उल्लेख केल्याशिवाय शिवाजी महाराजांचे कार्य पूर्णत्वास गेल्यासारखे वाटत नाही.

शिवाजी महाराज यांच्या शूर वीर मावळ्यांच्या यादीत प्रथम नाव स्मरते ते म्हणजे तानाजी मालुसरे यांचे. तानाजी यांच्या घरी त्यांच्या मुलाच्या लग्नाची जोरदार तयारी चालू होती. त्याचवेळी कोंढाणा किल्ल्यावर स्वारी करण्याची वेळ आली. त्यावेळी तानाजी यांनी आधी लगीन कोंढण्याचे मग रायबाचे असे सगळ्यांना सांगून लढाईसाठी निघून गेले. कोंढण्यावर शत्रूशी चार हात करतांना तानाजी मालुसरे धारातीर्थी पडल्याची बातमी महाराजांच्या कानावर गेले त्यावेळी महाराज निःशब्द झाले. त्यांच्या तोंडून एकच वाक्य बाहेर पडले ते म्हणजे 'गड आला पण सिंह गेला.' तानाजी मालुसरे यांच्यासारखे अनेक मावळ्यांची महाराजवर खूप निष्ठा आणि प्रेम होते म्हणून तर आपल्या जीवाची पर्वा न करता त्यांनी स्वराज्यासाठी आपल्या जीवाचे बलिदान दिले. महाराजांचे जीव वाचले पाहिजे म्हणून स्वतःचे जीव अर्पण करणाऱ्याच्या यादीत बाजीप्रभू देशपांडे यांचे स्मरण करणे अगत्याचे ठरते. लाख मेले तरी चालतील पण लाखाचा पोशिंदा वाचला पाहिजे असे म्हणून पन्हाळगडावरून विशालगडाकडे जाणाऱ्या रस्त्यावर घोडखिंडीत बाजीप्रभू यांनी शत्रूला रोखून धरले. जोपर्यंत महाराज गडावर सुखरूप पोहोचत नाहीत तोपर्यंत त्यांनी शत्रूशी चार हात केले. महाराज गडावर पोहोचल्याची तोफ ऐकल्यावरच त्यांनी आपला जीव सोडला. किती ती निष्ठा ! असे जिवाभावाचे मावळे मिळविणे हे खरंच भाग्याची गोष्ट आहे. अफजलखान यांच्या वधाच्या वेळी महाराजांचे अंगरक्षक जिवा महाल तात्काळ धावून गेला म्हणूनच म्हटले जाते होता जीवा म्हणून वाचला शिवा. अफझलखानाच्या मृत्यूनंतर त्यांनी त्याच्या शवाचे इस्लामी पद्धतीने अंत्यसंस्कार करून त्याची एक कबर प्रतापगडाच्या पायथ्याशी बांधली आणि त्या कबरीच्या कायम देखभालीची व्यवस्था केली. यावरून शिवाजी महाराजांची आपल्या शत्रूबद्दल असलेला आदर लक्षात येते. शिवाजी महाराजांच्या जीवनात असे अनेक प्रसंग आले ज्यात त्यांच्या मावळ्यांनी आपले जीव अर्पण करून महाराजांचे जीव वाचविले. अनेक शत्रू राज्यांना त्यांनी सळो की पळो करून सोडले. लाखाचा पोशिंदा जगाला पाहिजे असे सर्वांची मनोकामना असायची आणि त्याच विचारातून प्रत्येकजण स्वयंस्फूर्तीने कामाला लागत होते. महाराजांच्या सैन्यात सर्व जाती-धर्माचे व विविध पंथाच्या लोकांचा समावेश होता. सर्वधर्मसमभाव या वृत्तीने महाराजांचे सैनिक कार्य करत असत. राज्यातल्या प्रत्येक व्यक्ती विषयी महाराजांच्या मनात प्रचंड आस्था होती. कोणत्याही व्यक्तीची पिळवणूक होऊ नये, झाडांची कत्तल करू नका, शेतकऱ्यांच्या पिकांना नुकसान करू नका, स्त्रियांचा सन्मान करा अश्या प्रकारचे आदेश ते आपल्या सैन्याला देत असत यावरून महाराजांची दृष्टी आपल्या लक्षात येऊ शकते. शिवाजी महाराजांनी राज्यकारभारासाठी आठ मंत्री असलेले अष्टप्रधान मंडळाची नेमणूक केली होती. हे मंत्री राजांना राज्यकारभारविषयक कामाविषयी सल्ले देत असे. राज्यकारभारात तत्कालीन रूढ असलेल्या पारशी भाषेऐवजी मराठी आणि संस्कृत भाषेचा वापर करण्यास त्यांनी प्रोत्साहन दिले. शिवाजीराजे जेव्हा पुण्याचा कारभार पाहू लागले, तेव्हा त्यांनी स्वतःची स्वतंत्र राजमुद्रा तयार केली. शहाजीराजे व जिजाबाई यांची मुद्रा पारशी भाषेत होती, पण शिवाजी महाराजांनी राजमुद्रेसाठी संस्कृत भाषेचा वापर केला. शिवाजी महाराज दिसायला लहान मूर्ती जरी असली तरी त्यांची कीर्ती खूप महान होती. छत्रपती शिवाजी महाराज हे मराठी लोकांच्या अस्मितेचा एक अविभाज्य भाग आहेत. शिवाजी महाराजांचा जन्मदिवस हा सर्वत्र शिवजयंती म्हणून साजरा केला जातो. १६८०च्या एप्रिल महिन्यात वयाच्या ५० व्या वर्षी शिवाजी महाराजांचा मृत्यू झाला. आज छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती त्यानिमित्ताने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पावन स्मृतीस कोटी कोटी प्रणाम !

- नागोराव सा. येवतीकर, स्तंभलेखक
मु. येवती पो. येताळा
ता. धर्माबाद जि. नांदेड



# आयुष्यात चांगले दिवस मिळवण्यासाठी ...अपूर्वा नेमळेकर दिला मोलाचा सल्ला

मराठी सिनेसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्रींच्या यादीतील एक अभिनेत्री म्हणून अपूर्वा नेमळेकरला ओळखले जाते. 'रात्रीस खेळ चाले' या मालिकेमुळे ती घराघरात पोहोचली. या मालिकेत तिने शेवंता हे पात्र साकारले होते. यानंतर अपूर्वा नेमळेकर 'बिग बॉस मराठी'च्या चौथ्या पर्वात झळकली. विशेष म्हणजे ती या पर्वाची रनरअप ठरली होती. सध्या अपूर्वा ही 'प्रेमाची गोष्ट' या मालिकेत झळकत आहे. या मालिकेत तिने खलनायिकेचे पात्र साकारले आहे. आता मात्र तिच्या एका पोस्टने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले आहे. अपूर्वा नेमळेकर ही सोशल मीडियावर सतत सक्रीय असते. ती इन्स्टाग्रामवर सतत विविध फोटो आणि व्हिडीओ शेअर करताना दिसते. आता नुकतंच अपूर्वाने इन्स्टाग्रामवर एक स्टोरी शेअर केली आहे. यात तिने तिच्या खासगी आयुष्याबद्दल एक खुलासा केला आहे. तिची ही पोस्ट सध्या चर्चेत आली आहे.

अपूर्वा नेमळेकरची पोस्ट चर्चेत


तुमच्या आयुष्यातील चांगले दिवस मिळवण्यासाठी तुम्हाला काही वाईट दिवसांशी संघर्ष करावा लागतो, असे अपूर्वा नेमळेकरने म्हटले आहे. त्यासोबतच तिने संयम हीच गुरुकिल्ली आहे असा हॅशटॅगही यात वापरला आहे. सध्या तिची ही पोस्ट व्हायरल होत आहे. दरम्यान 'झी मराठी' वाहिनीवरील 'रात्रीस खेळ चाले' ही मालिका चांगलीच गाजली होती. या मालिकेतील प्रत्येक भूमिकेने प्रेक्षकांची मनं जिंकली होती. या मालिकेतील अण्णा नाईक आणि शेवंताची लव्हस्टोरी प्रचंड चर्चेत होती. या मालिकेत शेवंता ही भूमिका अभिनेत्री अपूर्वा नेमळेकरने साकारली होती. तिच्या या भूमिकेमुळे ती घराघरात लोकप्रिय झाली. या मालिकेमुळे तिचा चाहत्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली. 'प्रेमाची गोष्ट' मालिकेद्वारे छोट्या पडद्यावर पुनरागमन

सध्या अपूर्वा ही 'प्रेमाची गोष्ट' या मालिकेत झळकत आहे. या मालिकेद्वारे अपूर्वाने दीर्घ काळाने छोट्या पडद्यावर पुनरागमन केलं. या मालिकेत अपूर्वा नेमळेकर ही सईच्या आईची भूमिका साकारत आहे. सावनी असे तिच्या पात्राचे नाव आहे. तिच्या या भूमिकेला प्रेक्षकांच्या चांगलीच पसंतीस पडताना दिसत आहे. तिने यात खलनायिकेचे पात्र साकारले आहे. यात तिच्यासोबतच अभिनेता राज हंसनाळे आणि अभिनेत्री तेजश्री प्रधान हे कलाकारही प्रमुख भूमिकेत झळकत आहेत. त्यासोबत यात बालकलाकार इरा परवडे मुख्य भूमिकेत दिसत आहे. सध्या ही मालिकादेखील टीआरपीच्या यादीत टॉप ५ स्थानांवर आहे.

## माझा शेवटचा चित्रपट..., चित्रपटसृष्टीतून
# शाहरुख खान घेणार रिटायरमेन्ट!

शाहरुख खाननं नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत त्याच्या रिटायरमेन्टवर खुलासा केला आहे. बॉलिवूड अभिनेता शाहरुख खाननं त्याच्या करिअरमध्ये अनेक चित्रपट केले. त्यातील जास्त चित्रपट हे हिट ठरले आहेत. गेल्या वर्षभरापासून त्याच्या चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर रेकॉर्डतोड कमाई केली आहे. त्या आधी शाहरुखचे चित्रपट आधीसारखे हिट होत नव्हते. खरंतर, मोठ्या ब्रेकनंतर शाहरुखनं चित्रपटांमध्ये कमबॅक केलं आहे. खरंतर, मोठ्या ब्रेकनंतर शाहरुखनं जी एन्ट्री केली आहे त्यानंतर लागोपाठ त्याचे तिनही चित्रपट हे सुपरहिट ठरले आहेत. आता नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत शाहरुखनं त्याच्या रिटायरमेंटविषयी वक्तव्य केलं आहे. शाहरुखनं या मुलाखतीत म्हणाला की 'पहिली गोष्ट पुढची ३०-३५ वर्ष मी चित्रपटात काम करणं सोडणार नाही. आता माझा रिटायर होण्याचा काहीही प्लॅन नाही. माझी इच्छा आहे की माझा शेवटचा चित्रपट सगळ्यांना आवडायला हवा, संपूर्ण जगाला पसंत यायला हवा. या दरम्यान, शाहरुखनं प्रेक्षकांना उर्दू आणि अरेबिक शिकण्यास देखील सांगितले. जेणेकरून ते त्याचा शेवटचा चित्रपट समजू शकतील.' शाहरुखनं केलेल्या या वक्तव्यानं एक गोष्ट स्पष्ट झाली आहे की त्याचा शेवटचा चित्रपट हा संपूर्ण जगात पाहायला हवा आणि सगळ्यांना कळायला हवा अशी त्याची इच्छा आहे. या कार्यक्रमात किंग खाननं सांगितलं की ज्या दिवशी त्याचा चित्रपट प्रदर्शित होते, त्याच्या अगोदर तो जवळपास २ ते अडीच तास अंघोळ करतो. शाहरुख म्हणाला, भारतात चित्रपट हे शुक्रवारी किंवा गुरुवारी रात्री प्रदर्शित होतात. तर त्याच्या अगोदर म्हणजेच जवळपास २ ते अडीच तास मी माझ्या घरी अंघोळ करत असतो. त्यानंतर मी माझं संपूर्ण काम हे काढून टाकतो. त्यामुळे त्याला खूप मस्त वाटतं. शाहरुख आता लवकरच किंग या चित्रपटात दिसणार आहे. असं म्हटलं जातं की हा ॲक्शन पॅक चित्रपट असणार आहे.

# यशवंत महाशब्दकोडे



आडवे शब्द
१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे-येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्लवीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र
७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष
७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप
८०. मलई
८१. फरक
८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

उभे शब्द
१. यजमानीण
२. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार
५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार आ-ेळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई-वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा
३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य
४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण
६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा
७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

कोडे क्र.६ चे उत्तर

आडवे उत्तर
१.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.सामना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा

उभे उत्तर-१.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ ४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५३.माजघर ५५.कलम ५६.पळपुटा ५७.रमताराम ५९.वर ६१.सर ६२.नवागत ६४.साम्य ६५.नापास ६७.मसलत ६८.सागवान ६९.गवा ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ७५.सोय ७७.गर ७८.धन ७९.कंस

# क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांचा तोंडार ग्रामस्थांच्या वतीने सत्कार



उदगीर : मतदारसंघातील उदगीर तालुक्यात सर्वसाधारणपणे सर्वच महसुली मंडळांमध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती होती. परंतु राज्यातील दुष्काळ घोषित केलेल्या ४० तालुक्यांमध्ये काही महसुली मंडळांचाच समावेश करण्यात आलेला होता तर उदगीर तालुक्यातील काही महसुली मंडळात यापुर्वीच दुष्काळ जाहिर करण्यात आला होता. त्यात उदगीर तालुक्यातील तोंडार, नागलगाव, मोघा ही महसुली मंडळे राहिली असल्याने या भागा-चे आमदार तथा राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी आपत्ती व्यवस्थापण मंत्री अनिल पाटील यांची भेट घेवुन सदर तीन महसूल मंडळात दुष्काळ जाहिर करण्यासाठी लेखी पत्राव्दारे विनंती केली होती. त्यांची मागणी मान्य करुन उदगीर तालुक्यातील तोंडार, नागलगाव, मोघा या महसुली विभागात दुष्काळ घोषित करण्यात आल्याने क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांचा तोंडार ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

तोंडार सर्कलमध्ये दुष्काळ जाहिर झाल्याने त्यांना शासनाच्या अनुदानासह जमीन महसूलात सूट, सहकारी कर्जाचे पुनर्गठन, शेती-शी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती, कृषी पंपाच्या चालू विजबिलात ३३.५% सूट, शालेय / महाविद्यालयीन विद्यार्थ्याच्या परिक्षा शुल्कात माफी, रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता, आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर, टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतक-यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे आदी सुविधा शेतकऱ्यांना मिळणार असल्याचे क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी सांगितले.

आपल्या भागात पाऊस कमी झाल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले होते. याचा पाठपुरावा करून मतदारसंघातील शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्न करत होतो. त्यापैकी आपल्याच भागातील तोंडार, नागलगाव, मोघा हे महसुली मंडळे वगळण्यात आले होते मात्र शेतकऱ्यांच्या कष्टाची जाणीव ठेवून आपण त्याचा पाठपुरावा केला होता त्यामुळेच आज तोंडार सर्कल सह अन्य दोन सर्कल दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर करण्यात आले असल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक मदत होणार असल्याचे समाधान वाटत असल्याचे ना.संजय बनसोडे यांनी सांगितले.

यावेळी तोंडारसह परिसरातील प्रतिष्ठित नागरीक, सरपंच, चेअरमन, व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## समाजाने सौर ऊर्जेचा उपयोग करावा : प्रा. डॉ.देविदास केंद्रे

मुखेड- प्राचीन काळात लाकूड हाच मानवाचा एकमेव ऊर्जा स्त्रोत होता. १७ व्या शतका दगडी कोळसा व पेट्रोलियम हे ऊर्जा स्त्रोत सापडले. त्यांची ऊर्जा पुरवण्याची शक्ती लाकडापेक्षा प्रचंड असल्यामुळे त्यांचा वापर याच्यामध्ये केला गेला.१९ व्या शतकात मोठ मोठी जनित्रे निर्माण झाली.विद्युत शक्तीने जगाचे स्वरूप पालटून टाकले. विद्युत शक्तीवर चालणारी हज-ारो नवी उपकरणे, यंत्र तयार झाली. कोळसा, पेट्रोल, डिझेल,सी.एन.जी. व एल.पी.जी. हे ऊर्जास्रोत संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहेत.सौर ऊर्जा ही सूर्यापासून उष्णता व प्रकाश या रूपात खूप मिळते. समाजाने सौर ऊर्जेचा फायदा घ्यावा असे आवाहन प्रा. डॉ. देविदास केंद्रे यांनी ग्रामीण महाविद्यालय वसंत नगरने आयोजित भौतिकशास्त्र विभाग व एन.एस. एस. कॅम्प सांगवी (बे) येथे बोलताना ऊर्जे ची बचत या विषयावर बोलताना केले. या कार्यक्रमासोबतच प्रा. सुभाष कनकुटे यांनी पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज आहे असे ते म्हणाले.प्रा.डॉ.गुरुनाथ कल्याण यांनी संतांचे कार्य सांगून कबीराबद्दल उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांना त्यांचे विचार पटवून दिले.

# विठ्ठल मंदिर मुर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्यातून शितल मालू यांची वचनपुर्ती

लातूर/प्रतिनिधीः - माजी नगरसेविका सौ. शितल शिवकुमार मालू यांनी प्रभागातील कापड मिल परिसरात असलेल्या विठ्ठल रुक्माईच्या मंदिराचा जीर्णोद्धार करून मुर्ती प्राणप्रतिष्ठा करण्याचे वचन नागरिकांना दिले होते. या वचनाची पुर्तता करत आज सोमवार दि. १९ फेब्रुवारी रोजी जीर्णोद्धार केलेल्या मंदिरात विठ्ठल रुक्मीणी मुर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात येणार आहे. या सोहळ्यास प्रभागातील भाविकांसह नागरीकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन माजी नगरसेविका सौ. शितल मालू यांनी केले आहे.



सौ. शितल मालू यांनी आपल्या नगरसेवकाच्या कार्यकाळात त्यांच्या प्रभागात असलेल्या डालडा फॅक्टरी परिसरात असलेल्या मारुती मंदिराचा तर सुतमिल परिसरात असलेल्या विठ्ठल रुक्मीणी मंदिराचा जीर्णोद्धार केलेला होता. त्याचबरोबर टागोर नगर परिसरात उभारण्यात येत असलेल्या हनुमान मंदिरासाठी मोठे अर्थसहाय्य केलेले होते. सदर बाब लक्षात घेऊनच कापड मिल परिसरातील नागरीकांनी सौ. शितल मालू यांची भेट घेत येथे असलेल्या विठ्ठल रुक्मीणी मंदिराचा जीर्णोद्धार करून या मंदिरात मुर्ती प्राणप्रतिष्ठा करण्यात यावी अशी मागणी केलेली होती. या नागरीकांनी केलेल्या मागणीबाबत सकारात्मक विचार करून सौ. शितल मालू यांनी या मंदिराचा जीर्णोद्धार करण्याचा संकल्प केलेला होता. यापुर्वीही सदर मंदिर बांधकाम करून देण्याचा शब्द अनेक लोकप्रतिनिधींनी दिलेला होता. मात्र त्यांनी हा शब्द पाळलेला नव्हता. त्यामुळे सौ. शितल मालू आपला संकल्प पुर्ण करतील का याबाबत साशंकता निर्माण झालेली होती. त्यामुळेच सौ. शितल मालू यांनी कोणत्याही परिस्थितीत या मंदिराचा जीर्णोद्धार करून देत मुर्तींची प्राणप्रतिष्ठा करण्यात येईल असे वचन दिलेले होते.

या वचनाची पुर्तता करत सौ. शितल मालू यांच्या उपस्थितीत कापड मिल परिसरात असलेल्या मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आलेला असून या विठ्ठल रुक्मीणी मंदिरात सोमवार दि. १९ फेब्रुवारी रोजी मुर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा पार पडत आहे. या सोहळ्यानिमित्त सकाळी ८ वा. कलश यात्रा व मिरवणूक काढण्यात येणार असून यानंतर मुर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा होणार आहे. या सोहळ्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून या विविध कार्यक्रमांना परिसरातील भाविकांसह नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन माजी नगरसेविका सौ. शितल शिवकुमार मालू यांनी केले आहे.

# जळकोट तालुक्यात अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन व सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन प्रशिक्षण संपन्न

**माधव होनराव**

जळकोट : – राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्यामार्फत राज्यातील इयत्ता पहिली ते आठवी वर्गाला शिकवणाऱ्या सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व माध्यमाच्या शंभर टक्के शिक्षकांसाठी अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन व सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन या विषयावर सुरू असलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत जळकोट तालुक्यातील शिक्षकांचे प्रशिक्षण शकुंतलामाता प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा पाटोदा बु. येथे चार टप्प्यात पूर्ण करण्यात आले . तालुक्यातील एकूण ५०० शिक्षकांना तीन कुलाच्या माध्यमातून चार टप्प्यात प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणाच्या चौथ्या टप्प्याच्या समारोप प्रसंगी तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी जयसिंह जगताप हे उपस्थित राहून प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन केले.

मार्गदर्शनात श्री जगताप म्हणाले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीचे स्वप्न असून यामध्ये शाळा व शिक्षकांची भूमिका महत्त्वाची आहे. जागतिक स्तरावर विविध क्षेत्रातील बदल संशोधन आणि नवनवीन आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थी व शिक्षक यांना सक्षम करण्यासाठी अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन हे प्रशिक्षण उपयोगी पडणार आहे. एकविसाव्या शतकातील आव्हानांना सामोरे जायचे असेल तर मुलांना पारंपारिक पद्धतीने अध्ययन करून चालणार नाही त्यासाठी भविष्यवेधी शिक्षण प्रक्रिया आत्मसात करायला हवी. मुलांना शिकण्यापेक्षा शिकण्यासाठी प्रेरित केले की ते स्वतःच्या गतीने व मित्राच्या मदतीने



सहज शिकणार आहेत. शिक्षकाचे शिकवणे नाही तर प्रत्येक मूल स्वतः शिकते होण्यासाठी अनुकूल वातावरण अध्ययन अनुभव तयार करून देऊन विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ करण्याचे आव्हान यावेळी त्यांनी केले.

सदर प्रशिक्षणात शिक्षकानी मनुष्य म्हणून स्वतःला समजून घेणे, जागतिक दर्जाची स्वीकार्यता असलेले मुल विकसित करणे, भविष्याचा वेध घेणारे मुल तयार करणे, शंभर टक्के मुलांच्या शंभर टक्के क्षमता चा उपयोग करणे, पिसा रेडी मूल तयार करणे, अध्ययन स्तर, अध्ययन निष्पत्ती व एकविसाव्या शतकातील कौशल्य मुलांना स्वतः शिकण्यास प्रेरित करणे, मुलांना शिकण्यासाठी आव्हाने देणे, पीर लर्निंग , ग्रुप लर्निंग व विषय मित्र यांच्या मदतीने शिकणे, विद्यार्थ्यांच्या जिज्ञासूवृत्तीचा सन्मान करणे, विद्यार्थ्यांची स्वतःची अध्ययनाची गती वाढविणे, सेल्फी विथ सक्सेस, बहुविध बुद्धिमत्ता , ब्लूमटॅक्सॉनॉमी नुसार ज्ञान ,आकलन, उपयोजन, विश्र्लेषण, संश्र्लेषण व मूल्यमापन पायऱ्या.तसेच सहा सी , कॉन्फीडन्स , क्रिटीकल थिंकींग , क्रिएटीव्ह थिंकींग , कोलॅब्रेशन , कम्युनिकेशन कम्पॅशन ही कौशल्य विकसीत करणे, पाठ्यक्रम एक तृतीयांश वेळेत पूर्ण करणे, अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर करणे यासह अनेक शैक्षणिक बाबीवर निलेश घुगे सरांचे व्हिडिओ व सुलभकांच्या मार्फत सखोल स्वरूपात मार्गदर्शन करण्यात आले.

चार दिवस अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन व एक दिवस सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन या विषयावर देण्यात आलेल्या प्रशिक्षणातून काम निम्म्यावर परिणाम दुप्पट व आनंद तिप्पट दिसून येणार आहे . शकुंतला माता आश्रम शाळेच्या भव्य प्रांगणात चार टप्प्यात तीन कुलासाठी सुलभक म्हणून अर्जुन जाधव , देविदास केंद्रे , माधव देमगुंडे , प्रमोद टाकळे , गणेश वळसंगीकर ,पंडित केंद्रे, प्रेमदास राठोड, संतोष सोनवळे , शंभुदेव केंद्रे यांनी मार्गदर्शन केले.

उत्कृष्ट सुलभक म्हणून कार्य केल्याबद्दल तालुक्याच्या वतीने गटशिक्षणाधिकारी जयसिंह जगताप यांनी सर्व सुलभकांचा सत्कार केला. प्रशिक्षणाच्या चौथ्या टप्प्यातील सर्व प्रशिक्षणार्थ्यांच्या वतीने मुख्याध्यापक काटे सर व बारसंगे सर यांच्या नेतृत्वाने सुलभक माधव देवगुंडे, अर्जुन जाधव, देविदास केंद्रे व कुमारी बिपाशा शेख यांच्या विशेष सत्काराचे आयोजन करण्यात आले होते.

सदरील प्रशिक्षण यशस्वीतेसाठी विस्तार अधिकारी नारायण तीगोटे गट समन्वयक किशन बिराजद-ार , शकुंतला माता आश्रम शाळेचे मुख्याध्यापक देशमुख सर, सास्तुरकर सर , बालाजी केंद्रे तसेच आश्रम शाळेचे सर्व कर्मचारी व गट साधन केंद्रातील सर्व साधनव्यक्ती विशेष तज्ज्ञ , विशेष शिक्षक व सर्व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले .

मार्गदर्शन , नियोजन, व्यवस्थापन व नेतृत्व शिक्षकांनी केले की मूले स्वतः शिकणार आहेत हा विश्र्वास प्रशिक्षणातून शिक्षकांना मिळाला तसेच सेल्फी विथ सक्सेस, प्रशकौशल्य व विद्यार्थ्यांना आव्हान देणे या उपक्रमाची तूफान यशस्वीता मागील प्रशिक्षणार्थी बचकडून दिसत असल्याचे गटसाधन केंद्रातील विषय साधनव्यक्ती तथा प्रशिक्षण प्रमुख देविदास केंद्रे व अर्जुन जाधव यांनी सांगितले.


## पाहिजेत

**दैनिक यशवंत विभागीय कार्यालय उदगीर येथे संपादकीय विभागात लिखाणाची आवड असणाऱ्या प्रतिनिधीची आवश्यकता आहे.**

इच्छुकांनी संपर्क साधवा.

संपर्क : दैनिक यशवंत विभागीय कार्यालय नगर परिषद व्यापारी संकुल E विंग उदगीर मो.न ९८५०२२८२४०






# नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांचे जीवनमान उंचावेल : गायकवाड

उदगीर / प्रतिनिधी- भारताला ज्ञान महासत्ता बनवण्यासाठी विद्यार्थ्यांकडे ज्ञानप्राप्ती व आवश्यक कौशल्ये विकसित करण्यासाठी, भारतातील लोकसंख्येला गुणवत्तापूर्ण आणि नाविन्यपूर्ण शिक्षण देण्यासाठी व संशोधनाच्या विविध सुविधा उप-लब्ध करून देण्यासाठी,अधिक लवचिक आणि सर्वसमावेशक शिक्षण प्रणाली प्रदान करणे ही काळाची गरज लक्षात घेऊन भारत सरकारने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० लागू केले आहे. असे शिवाजी महाविद्यालय,उदगीर येथील प्रा.डॉ. विश्र्वंभर गायकवाड यांनी मत व्यक्त केले.

देवणी येथील पंडित दीनदयाल उपाध्याय महाविद्यालय, देवणीच्या राष्ट्रीय सेवा योज-नेचे विशेष वार्षिक युवक नेतृत्व शिबिर सावरगाव (ता..देवणी) येथे उद्धेश्र्वर शिक्षण संस्था व महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या शिबिरातील बौद्धिक सत्रामध्ये नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० व स्पर्धा परीक्षा या विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.डॉ.बी.एन. नागलगावे होते.





## उदगीर मनोरंजन

**कल्पना** 70MM A/C DOLBY

११:३०,२:३०,०५:३०,८:३०

दररोज ४ शो




## उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर

फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|

| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |
|---|---|

**मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुग्णालय**

**भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स**

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!

अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ — डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) — डॉ. दिपाली पाटील (MS)

डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) — डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष — व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर — लॉ. प्रदिप बेंद्रे सचिव




## मनाजोगी शेतजमीन व एन.ए, लेआउट मंजूर असलेले प्लॉट्स विकणे आहे


**१. जमीन** :- स्वतंत्र रोड असलेली, राष्ट्रीय महामार्गाजवळ, तोगरी गावालगत, उदगीर पासून १३ कि.मी. अंतरावर, उत्तम प्रतीची बागायती जमीन, कारखाना किंवा उद्योग करण्यायोग्य, भविष्यात प्लॉटींगची, मौजे तोगरी ता.उदगीर येथील जमीन गट नं. १२१ क्षेत्र १ हे ७० आर योग्य भाव असल्यास विकणे आहे.

**२. प्लॉट्स** :- कल्पना ते निडेबन रोडवरील उजव्या बाजूस आनंदनगर मौजे निडेबन येथील सर्वे नं. २/न/१ मधील एनएलेआउट मंजूर असलेले प्लॉट नं. ७,२२ अ, २२ ब असे तीन प्लॉट विकणे आहे ज्याचे क्षेत्रफळ अनुक्रमे ९६२ चौ. फुट, ८०० चौ. फुट व १०६० चौ. फुट आहे.

गरजूंनी खालील मो. नंबरवर संपर्क साधावा

मो.नं. ९४०४६१०१६१

# या देशात रामराज्य प्रस्थापित करण्यासाठी प्रत्येकाने रामा प्रमाणे आचरण करायला हवे



लातूर / प्रतिनिधी- या देशात रामराज्य पुन्हा प्रस्थापित व्हावे अशी तमाम हिंदू प्रेमींची इच्छा आहे .अयोध्येतील श्रीराम मंदिर उभारणी नंतर ही इच्छा पुढे येत आहे .यासाठी प्रत्येकाने स्वतःला बदलण्याची गरज आहे. प्रभू श्रीरामाप्रमाणे आचार - विचार आचरणात आणून प्रत्येकाने राम बनण्याचा प्रयत्न केला तरच हे शक्य आहे ,असे प्रतिपादन परमपूजनीय विद्यानंदजी सागर महाराज (बाबा )यांनी केले .

लातूर येथील श्री श्री राधाकृष्ण सनातन सत्संग समितीच्या वतीने राजीव गांधी चौकातील पंचमुखी हनुमान मंदिर परिसरात उभ्या करण्यात आलेल्या भव्य कथा मंडपात पूजनीय बाबांच्या अमोघ वाणीतील श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे .दि. २१ फेब्रुवारी २०२४ पर्यंत चालणाऱ्या या कथेस दिवसागणिक भाविकांची गर्दी वाढत आहे .हजारो स्त्री-पुरुष भावीक दररोज महाप्रसादाचा आस्वाद घेत आहेत. ज्या ठिकाणी भागवत कथा आयोजित करायची त्या ठिकाणी अखंड अन्नदान करण्याचा बाबांचा आग्रह असतो. त्यानुसार संयोजन समितीच्या वतीने भोजन शाळेतून दररोज महाप्रसादाचे शिस्तबद्ध पद्धतीने वाटप करण्यात येत आहे .यासाठी हजारो स्त्री-पुरुष सेवेकरी परिश्रम घेत आहेत.

श्रीमद् भागवत कथेच्या पाचव्या दिवशीच्या प्रवचनात पूजनीय बाबांनी राम अवतार ,श्रीकृष्ण अवतार ,रामराज्य ,रासलीला, श्रीकृष्ण जन्मोत्सव आदीवर भाष्य केले. ते म्हणाले की ,अयोध्या मध्ये प्रभू श्रीरामाचे भव्य मंदिर उभे राहावे ही या देशातील तमाम हिंदू प्रेमी नागरिकांची मागणी होती. ती पूर्ण झाली असून अयोध्येत भव्य राम मंदिराची उभारणी झाली आहे. या भव्य दिव्य सोहळ्यास देशभरातील साधुसंत उपस्थित होते. दि. २२ जानेवारी २०२४ रोजी अयोध्येत झालेल्या अविस्मरणीय सोहळ्यास उपस्थित राहण्याचे भाग्य मला मिळाले .यावेळी रामराज्य प्रस्थापित व्हावे अशी तमाम साधुसंतांनी अपेक्षा व्यक्त केली होती ;याचा उल्लेख बाबांनी आपल्या प्रवचनात करून रामराज्य प्रस्थापित व्हायचे असेल तर प्रत्येकाने आपल्या आचरणात बदल करायला हवा .राम कसे वागायचे ?त्यांचे आचार्य विचार कसे होते ?हे समजून घेणे गरजेचे आहे .केवळ रामनामाचा गजर केला जयघोष केला म्हणजे रामराज्य प्रस्थापित होणार नाही. हे कठीण काम आहे ,पण अशक्य देखील अजिबात नाही. यासाठी प्रत्येकाने राम बनण्याचा प्रयत्न केला पाहिजे .या देशाला रामराज्याची ,रामाची गरज आहे. प्रभू रामचंद्र ,भगवान श्रीकृष्ण यांचे चरित्र समजून घेण्याची गरज आहे. भावी पिढीला राम, श्रीकृष्णाचा इतिहास समजावून सांगण्याची गरज आहे .अशा कथा -कीर्तनातून रामनामाचा जागर होत असतो, संकीर्तन होत असते. त्यामुळे कथा -कीर्तनाला महत्त्व आहे. केवळ टाळ बडवण्यासाठी , नामजप यासाठीकथा कीर्तनाचे आयोजन केले जात नाही; यातून संकीर्तन होऊन माणूस बदलण्याची प्रक्रिया सुरू होते. समर्पित होऊन सेवा करण्याची, राष्ट्रनिष्ठा जागृत करण्याची उर्मी अशा कथा- कीर्तनातून पुढे येत असते .त्यामुळे एवढा अवाढव्य खर्च करून यज्ञ करण्याची ,कथा करण्याची गरजच काय ?असा सवाल उपस्थित करणे गैर व चुकीचे आहे.

# महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार सोहळा २२ फेब्रुवारीला

मुंबई : कोरोनामुळे रखडलेल्या २०१९मधील मराठी चित्रपटांचा ५७ व्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार सोहळा २२ फेब्रुवारीला संपन्न होणार आहे. याच सोहळ्यात अशोक सराफ यांना महाराष्ट्र भूषण आणि पं. सुरेश वाडकर यांना गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

५६ वर्षे महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार सोहळ्याचे आयोजन सांस्कृतिक कार्य संचालनालय करत होते. एप्रिल २०२३ पासून ही जबाबदारी फिल्मसिटीकडे सोपवण्यात आली आहे. त्यामुळे यंदा प्रथमच महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवाचे आयोजन करत आहे. २२ फेब्रुवारीला वरळीतीतील एनएससीआय डोममध्ये हा सोहळा होणार आहे. महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. अविनाश ढाकणे आणि सह व्यवस्थापकीय संचालक संजय कृष्णाजी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

याबाबत अविनाश ढाकणे म्हणाले की, आतापर्यंत महाराष्ट्र





राज्य चित्रपट पुरस्कार सोहळा सांस्कृतिक कार्य संचालनयातर्फे आयोजित केला जायचा, पण हे पुरस्कार चित्रपटांशी संबंधित असल्याने चित्रपट महामंडळाकडे ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे. कोरोनामुळे मागील दोन वर्षांचे पुरस्कार द्यायचे राहिले होते. या सोहळ्यात चित्रपती व्ही. शांताराम आणि राज कपूर पुरस्कारांसह २०१९ वर्षात सेन्सॉर झालेल्या मराठी चित्रपटांचे पुरस्कार देण्यात येतील. महाराष्ट्र भूषण पुरस्कार यंदा अशोक सराफ यांना घोषित झाला आहे. तो देखील या कार्यक्रमात अशोक सराफ यांना प्रदान करण्यात येणार आहे. गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार पं. सुरेश वाडकर यांना याच कार्यक्रमात देण्यात येणार आहे. या सोहळ्यातील मनोरंजनपर कार्यक्रमाची जबाबदारी नृत्य दिग्दर्शक सुभाष नकाशे यांच्याकडे आहे.

हे आहेत अंतिम १० चित्रपट

महाराष्ट्राच्या सर्वोत्कृष्ट चित्रपट या विभागात तीन सर्वोत्कृष्ट चित्रपट निवडले जातात. यात प्रथम क्रमांक दादासाहेब फाळके सर्वोत्कृष्ट चित्रपट, द्वितीय क्रमांक बाबूराव पेंटर सर्वोत्कृष्ट चित्रपट, तृतीय क्रमांक मा. विनायक सर्वोत्कृष्ट चित्रपट असे तीन पुरस्कार देण्यात येतात. यात पांघरुणफ, ताजमहाल, आनंदी गोपाळ, वाय, बार्डो, प्रवास, मिस यू मिस्टर, बस्ता, स्माईल प्लीजफ आणि बाबा या १० सिनेमांचा अंतिम चित्रपटांमध्ये समावेश आहे. याखेरीज व्ही. शांताराम सामाजिक प्रश्न हाताळणारा चित्रपट, दादा कोंडके ग्रामीण प्रश्न हाताळणारा चित्रपट हे तीन महत्वाचे पुरस्कारही प्रदान करण्यात येतील.

चार वर्षांचे पुरस्कार लवकरच

केवळ २०१९मधील चित्रपटांचेच स्क्रिनिंग झालेले आहे. २०२०, २०२१, २०२२, २०२३मधील चित्रपटांचे स्क्रिनिंग व्हायचे बाकी आहे. त्यामुळे या वर्षांमध्ये रिलीज झालेल्या चित्रपटांचे पुरस्कार वितरण नंतर होणार आहे.

एप्रिल २०२० मध्ये अपेक्षित होता

१ जानेवारी २०१९ ते ३१ डिसेंबर २०१९ या कालावधीत सेन्सॉर झालेल्या सिनेमांचा हा पुरस्कार सोहळा आहे. हा सोहळा एप्रिल २०२०मध्ये होणे अपेक्षित होते, परंतु कोरोनामुळे तो होऊ शकला नव्हता.

२० तारखेचा मुहूर्त टळला

महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कार सोहळा २० फेब्रुवारीला करण्याची योजना आखण्यात आली होती, पण अधिवेशनामुळे हा कार्यक्रम दोन दिवस पुढे ढकलण्यात आला आहे.

# दयानंद कला महाविद्यालयात इ. १२ वीच्या विद्यार्थ्यांना निरोप



लातूर /प्रतिनिधी : इयत्ता १२वीच्या विद्यार्थ्यांना निरोप नसुन पुढील शैक्षणीक जीवनासंदर्भात शुभेच्या आहेत. आज दि.१७.०२.२०२४रोजी सकाळी ठीक ११.००वा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या कल्पनेतुन हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड होते. प्रमुख उपस्थिती उपप्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांची होती. आपल्या अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी असे प्रतिपादित केले की, विद्यार्थ्यांना एनपीई अभ्यासक्रमाच्या माध्यमातून करिअरच्या विविध संधी प्राप्त होणार आहेत. संशोधनाची क्षेत्र तुमच्यासाठी खुली होणार आहेत. याचा विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक जीवनामध्ये फायदा घ्यावा. तसेच मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषेबरोबर इतर कोणत्याही जागतिक भाषेवर आपले प्रभुत्व मिळवावे.

प्रमुख पाहुणे, उपप्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांनी आपल्या मनोगतात असे प्रतिपादन केले की, पदवी अभ्यासक्रमाचा कनिष्ठ विभाग हा पाया आहे. ही सगळी शैक्षणिक यंत्रणा विद्यार्थ्यांसाठी आहे. विद्यार्थ्यांनी याचा उपयोग करून आपल्या ज्ञानाच्या कक्षा रूंदवाव्यात.

निरोप समारंभ कार्यक्रम प्रसंगी उपप्राचार्य प्रा. अनिलकुमार माळी यांनी असे प्रतिपादित केले, निरोप दिल्याने नाते कधीच तुटत नसते. विद्यार्थ्यांनी आपल्या अंगी चांगले गुण जोपासावेत, स्वच्छ भावनेने परीक्षा देऊन यश मिळवावे व महाविद्यालयाचे नाव मोठे करावे. महाविद्यालय कायम विद्यार्थ्यांच्या ऋणात रहाणे पसंत करते. विद्यार्थ्यांच्या यशासाठी सर्व प्राध्यापक, विद्यार्थ्यांना शैक्षणिक गुणवत्ते बरोबर इतरही कला गुणांना वाव देण्यासाठी मार्गदर्शन करत असतात. पर्यवेक्षक डॉ. दिलीप नागरगोजे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना, आपण अधिक २ स्तरावरील शिक्षण घेण्यासाठी या महाविद्यालयाची निवड केलात. त्यासाठी हे महाविद्यालय आपले अभिनंदन करते. तसेच आमच्या परीने आपल्या शैक्षणिक गरजा पुर्ण करण्याचा आम्ही प्रयत्न केलेला आहे. त्याचेच फलित बारावी बोर्ड परीक्षेत निश्चित दिसुन येईल. तसेच दोन वर्ष तुम्ही आमच्या सोबत जोडले जाणे हेच आमच्यासाठी आनंद दायक आहे. आपल्या प्रास्ताविकपर मनोगतात प्रा. दिनेश जोशी यांनी संस्कार आणि शिकवण्याच्या बळावर आयुष्यातील कोणत्याही संकटावर मात करता येते. हे संस्कार आपल्याला महाविद्यालयात मिळतात. केवळ विध्यार्थी म्हणूनच नाही तर माणूस म्हणून घडवण्याचे काम प्राध्यापक आणि महाविद्यालये करत असतात. याच शिदोरीच्या जोरावर मोठी स्वप्ने पहा आणि ती पूर्ण करण्यासाठी पूर्ण ताकदीनिशी प्रयत्न करा. यश तुमच्या पदरी निश्चित पडेल असे मनोगत व्यक्त केले. तसेच इयत्ता १२ च्या कु. अनुष्का बनकर, कु. पल्लवी माने, कू. साक्षी कोकाटे, कू.समृद्धी भोसले, कार्तिक ल्हवरे,रवी ढोबळे, रोहित पाल, यांनी आपल्या मनोगतातुन सर्व सभागृहाला भावनिक साद घालुन आपले विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाची सांगता सांस्कृतिक कार्यक्रमाने करुन यानंतर विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन स्नेहल साळुंके, या विद्यार्थिनीने केले. तर आभार प्रा.मनोज गवरे यांनी मानले. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने विद्यार्थी तसेच प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

# कोट्यवधींच्या निधीनंतरही स्वच्छतागृहांची दैना

मुंबई : प्रतिनिधी- राज्याची जीवनवाहिनी असलेल्या एसटीच्या स्थानकांसह त्यातील स्वच्छतागृहांच्या स्वच्छतेसाठी ५०० कोटींहून अधिक निधी उपलब्ध झाल्यानंतरही या स्वच्छतागृहांतील स्वच्छतेचा दर्जा खालावलेला आहे. यामुळे एक मार्च ते ३१ मार्च दरम्यान विशेष तपासणी मोहीम हाती घेण्याचा निर्णय एसटी महामंडळाने घेतला आहे. यासाठी महामंडळाने १० निकष जाहीर केले असून, त्यानुसार स्वच्छता नसल्यास आगार व्यवस्थापकांवर कारवाई केली जाणार आहे.

ठाण्यातील खोपटमध्ये ५,१५० ई-बस लोकार्पण कार्यक्रमावेळी मुख्यमंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष एकनाथ शिंदे यांनी स्वच्छतागृह, विश्रांतीगृहांची पाहणी केली. यावेळी त्यांनी स्वच्छतेच्या स्थितीबाबत नाराजी व्यक्त केली. एप्रिलमध्ये सुट्यांचा हंगाम सुरू होणार असल्याने प्रवाशांचा राबता अधिक असण्याची शक्यता आहे. यामुळे मार्चमध्येच एसटी स्थानकांची विशेषत: स्वच्छतागृहांसाठी तपासणी मोहीम हाती घेण्यात आली आहे. एसटीच्या मध्यवर्ती कार्यालयातील अधिकारी-कर्मचा-यांकडून अचानक भेटीद्वारे राज्यातील सर्व स्थानक-आगारांतील स्वच्छतागृहांच्या दर्जाचा आढावा घेण्यात येणार आहे. यांसह एसटी चालक-वाहकांसाठीच्या विश्रांतीगृहातील स्वच्छतागृहांची तपासणीही करण्यात येणार आहे, असे महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी सांगितले.

अस्वच्छता असल्यास काळ्या यादीत

स्वच्छतागृहांच्या स्वच्छता, टापटीपपणा यामध्ये कमतरता असल्याचे आढळल्यास संबंधित संस्थेवर कारवाई करण्यात येणार आहे. दंडात्मक कारवाई, कंत्राट रद्द करणे, काळ्या यादीसाठी शिफारस अशा प्रकारची कारवाई असेल. तपासणी करणा-या अधिका-यांना कारवाईचे अधिकार आहेत. अस्वच्छ स्वच्छतागृहे आढळलेल्या संबंधित आगार व्यवस्थापकावर शिस्त व अपील कार्यपद्धतीनुसार कारवाई करण्यात येणार आहे. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर एसटी स्थानक मोहिमेनुसार १ मे ते ३१ डिसेंबर २०२३चा अहवाल जाहीर करण्यात आला. मुंबईतील सहा स्थानकांतील स्वच्छता मध्यम स्वरूपाची आहे. ठाण्यात १३ स्थानकांपैकी ८ स्थानके ५० पेक्षा कमी गुण मिळवत नापास झाले. खोपटला स्वच्छतेसाठी ५९ गुण मिळाले.

# माजी क्रिकेटपटू युवराज सिंगच्या घरी चोरी

चंदिगड : टीम इंडियाचा माजी क्रिकेटपटू युवराज सिंग याच्या पंचकुला येथील घरात चोरी झाल्याची घटना समोर आली आहे. युवराजच्या घरातून ७५ हजार रुपये आणि दागिन्यांची चोरी झाली. युवराज सिंगची आई शबनम सिंग यांनी घरातील नोकर आणि मोलकरणीवर चोरीचा संशय व्यक्त केला आहे. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

शबनम सिंग यांनी सांगितले की, सप्टेंबर २०२३ मध्ये त्या त्यांच्या गुरुग्राम येथील घरी राहायला गेल्या होत्या. ५ ऑक्टोबर २०२३ रोजी त्या पंचकुला येथील घरी परतल्या, तेव्हा त्यांना पहिल्या मजल्यावरील खोलीच्या कपाटातून काही दागिने आणि सुमारे ७५ हजार रुपये रोख गायब झाल्याचे आढळले. यानंतर त्यांनी इकडे-तिकडे चौकशी करत शोध घेतला, मात्र काहीही सापडले नाही.



शबनम सिंग यांनी पोलिसांना सांगितले की, घरातील मोलकरीण ललिता देवी आणि नोकर सालिंदर दास यांनी २०२३ मध्ये दिवाळीच्या आसपास नोकरी सोडली होती. त्यामुळे त्यांच्यावर संशय घेतला जातोय. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा तपास सुरू असून त्यानुसार पुढील कारवाई केली जाईल, असे पोलिसांनी सांगितले.


## दक्षिण मध्य रेल्वे

दक्षिण मध्य रेल्वेच्या सविस्तर माहितीसाठी आपण
www.scr.indianrailways.gov.in या संकेतस्थळावर पाहू शकता

**खुली ई-निविदा नोटीस नं. सी/ई.सी/ई.२९/इलेक्ट/एम/एससी/५०/पीए/एसडब्ल्यूऊ/ओएसडब्ल्यू/ २०२३-२४ दि.१५.१२.२०२४**

PUB/0155

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने, ११-०३-२०२४ रोजी १५.०० तासांपर्यंत खाली दिलेल्या कामासाठी खाली स्वाक्षरी केलेले ई-निविदा आमंत्रित करतात

क्रमांक:- १., ई-निविदा क्रमांक:-निविदा क्रमांक सी/ए.२९/इलेक्ट/एम/एसी/५०/पीए/एसडब्ल्यू/ओएसडब्ल्यू/ओटी/२०२३-२४ निविदा क्रमांक ई-एम-एससी-५०-ओटी-२०२३-२४, कामाचे नाव:- सिकंद्राबाद डिवीजन:- विद्युत देखभाल विभाग -(i) वेटिंग हॉलचे नूतनीकरण, बुकिंग ऑफिस, फिरत्या क्षेत्रांचा विकास,पीएफवर शौचालये बांधणे आणि एससी विभागातील एफओआयएस खोल्या (ii) एससी विभागातील स्थानकांवर रस्त्यांकडे जाण्यासाठी सुधारणा आणि (iii) एससी, एचवायबी, एमयुजीआर आणि बिदर. शेड्युल बी- येथे बुकिंग कार्यालये, वेटिंग हॉल, शौचालये, पाणीपुरवठा आणि टीटीई विश्रामगृहांमध्ये सुधारणा. शेड्यूल बी -हैदराबाद-हैदराबाद स्टेशनवर (जी+१) टाईप-II क्वार्टर्सचे बांधकाम-०८ युनिट्स शेड्यूल C-चित्तापूर-सीटी येथे रनिंग रूमची क्षमता वाढवणे/ सुधारणा - इलेक्ट्रिकल व्यवस्था.,
निविदा मूल्य रु.:-९१३९७६९.७५/ -,
इएमडी(रु):-१८२८००.००,
सीटीएफ:- ००,
पूर्ण होण्याचा कालावधी:- ६ महिने.

सीनियर विभागीय विद्युत अभियंता (एम)/ सिकंदराबाद

ए०१८७

निविदा च्या पुढील अटी व आधिक माहितीसाठी (निविदाकागदपत्रात उपलब्ध)आणि कागदपत्र डाउनलोड करणेसाठी आमची वेबसाईटला https://www.ireps.gov.in or www.scr.indianrailways.gov.in भेट द्या


पान १ वरून

## मराठा...

आदेशानुसार एसटी सेवा सुरू करण्याबाबत निर्णय घेतला जाणार असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान गेल्या दोन दिवसांत नांदेड जिल्ह्यात एसटी महामंडळाचे ८० लाखांचे नुकसान झाले आहे.

२१ तारखेनंतर आंदोलनाची दिशा

दरम्यान, महाराष्ट्रभर सुरू असलेले आंदोलन शांततेत करावे. आंदोलनाबाबत आपण २१ तारखेनंतर दिशा ठरवणार आहोत, असे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. तसेच यावेळी आंदोलन करताना कुठलाच धर्म किंवा जात आडवी न येता सर्व दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रापर्यंत जाता येईल, त्यांना पोचता येईल, त्यांना कुठलाही त्रास होणार नाही, असे आंदोलन करण्याचे आवाहन जरांगेंनी आंदोलकांना केले आहे.

सेवा सुरू करण्याबाबत निर्णय घेतला जाणार असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान गेल्या दोन दिवसांत नांदेड जिल्ह्यात एसटी महामंडळाचे ८० लाखांचे नुकसान झाले आहे.

२१ तारखेनंतर आंदोलनाची दिशा

दरम्यान, महाराष्ट्रभर सुरू असलेले आंदोलन शांततेत करावे. आंदोलनाबाबत आपण २१ तारखेनंतर दिशा ठरवणार आहोत, असे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. तसेच यावेळी आंदोलन करताना कुठलाच धर्म किंवा जात आडवी न येता सर्व दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रापर्यंत जाता येईल, त्यांना पोचता येईल, त्यांना कुठलाही त्रास होणार नाही, असे आंदोलन करण्याचे आवाहन जरांगेंनी आंदोलकांना केले आहे.

## शिवजयंतीदिनी...

म्हणून जाहीर करण्यात येईल. दांडपट्ट्याला राज्यशस्त्र जाहीर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य आहे, असे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटले आहे.

## भाजप सत्तेसाठी...

जिंकाव्याच लागतील. अनेकदा लोक मला सांगतात तुम्ही इतकं सगळं केलंत आता कशाला धावपळ करता? त्यावर मी सांगतो दहा वर्षात निष्कलंक कार्यकाळ आपण दिला आहे. २५ कोटी लोकांना आम्ही गरिबीतून बाहेर काढलं आहे. आपण आपल्या देशाला महाघोटाळ्यांमधून आणि दहशतवादी हल्ल्यांमधून मुक्ती दिली आहे. आपण गरीब आणि मध्यमवर्गीयांचं आयुष्य यांचा स्तर उंचावून दाखवला आहे, असं पंतप्रधान मोदी म्हणाले.

छत्रपती शिवरायांची प्रेरणा घेऊन मी सांगतो

एकदा एक बडे नेते मला भेटले. मला म्हणाले तुम्ही पंतप्रधान झालात ही खूप मोठी गोष्ट आहे. तुम्ही मुख्यमंत्रीही बराच काळ होतात, दुसऱ्यांदा पंतप्रधान झाला. आता तर थोडा आराम करा. असं मला एक बडे नेते म्हणाले होते. त्यांची ती भावना राजकीय अनुभवांतून आली होती. पण आपण राजकारण करत नाही आपण राष्ट्राची सेवा करतो. आपण छत्रपती शिवाजी महाराजांना मानणारे आहोत. छत्रपती शिवराय हे छत्रपती झाले म्हणून त्यांनी आराम केला नाही. त्यांचं त्यांचं राज्य वाढवलं. त्यांचीच प्रेरणा घेऊन मी देखील हेच सांगतो आहे की मी देखील शांत बसणार नाही. राष्ट्राला विकसित राष्ट्र करायचं आहे हा माझा संकल्प आहे. जर मी माझ्या घराची काळजी करत बसलो असतो तर कोट्यवधी लोकांसाठी घरं बांधता आली नसती असंही मोदी यांनी म्हटलं.

आपण जुनाट व्यवस्था मूळापासून बदलल्या

आधी लोकांना वाटायचं सरकार बदलतं, व्यवस्था बदलत नाही. मात्र आपण जुन्या विचारसरणीतल्या व्यवस्था बाहेर काढल्या. ज्यांना कुणी विचारत नव्हतं त्यांची आपण पूजा केली आहे हे कुणी विसरु नका. आदिवासी समाजातल्या सर्वात मागास समाजाला कुणी विचारतही नव्हतं त्यांच्यासाठी आपण योजना तयार केली. फूटपाथ, गाड्यांवर काम करणाऱ्या लोकांचा विचार कुणी केला नव्हता त्यांच्यासाठी आपण पीएम स्वनिधी योजना तयार केली. आपल्याकडे मुलींना गर्भात मारुन टाकलं जाण्याची कुप्रथा होती. त्याविरोधात समाजजागृती आणि कायद्याचा आधार घेतला. ङ्गबेटी बचाओ, बेटी पढाओफही मोहीम आपण मोठ्या प्रमाणावर चालवली हे विसरता येणार नाही असंही मोदी यांनी भाषणात म्हटलं.

काँग्रेस अस्थिरता आणि घराणेशाहीचं प्रतीक

काँग्रेस आपल्या लष्कराचे मनोबल कमी करण्याचं काम करत आहे. काँग्रेस अस्थिरता आणि घराणेशाहीचं प्रतीक आहे. काँग्रेस गोंधळलेली आहे. मोदीवर टीका करणे हा एकच त्यांचा अजेंडा आहे. भारत सशक्त झाल्यास जगाचं हित होईल हे सर्वच जण मानतात. पाच अरब देशांनी मला सर्वोच्च सन्मान दिला. काँग्रेसकडे विकासाचा रोडमॅप नाही. त्यांच्याकडे वैचारिक लढाईचं सामर्थ्य नाही, अशी टीका पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केली.

## विलासराव...

तट बाजूला गेल्याने आता काँग्रेस अधिक मजबूत झाली आहे. काँग्रेस संपवणारे संपतील पण काँग्रेस कधी संपली नाही, असे लोकनेते विलासराव देशमुख नेहमी सांगत असत. पक्षातील नवतरुणांनी आपल्या नेत्याचा आदर्श समोर ठेऊन आजपासून कामाला लागावे.जेणे करून राज्यात पुन्हा काँग्रेस सत्तारूढ झालेली आपल्याला पाहयला मिळेल.

यावेळी माजी मंत्री थोरात म्हणाले, लोकनेते विलासराव देशमुख हे एक अभूतपूर्व व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी केलेले सहकार, शिक्षण, सिंचन, औद्योगिक, वैद्यकीय क्षेत्रातील लोकाभिमुख कार्य आजही आपणाला लाभदायी ठरत आहे. माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आज मांजरा परिवारातील साखर कारखाने यशस्वीपणे वाटचाल करीत असून सहकार क्षेत्रात पश्चिम महाराष्ट्राबरोबर मराठवाडा विभागातील सहकार चालत आहे. दिलीपराव देशमुख यांच्या नेतृत्त्वाखाली आमदार धीरज देशमुख जिल्ह्यातील सहकार आणि राजकारण सांभाळतील. माजी मंत्री अमित देशमुख यांच्याकडे आज महाराष्ट्र अपेक्षेने पाहत आहे. त्यांनी राज्यभरात फिरून पक्ष संघटना मजबूत करावी, असे आवाहन करून आम्ही त्यांना सर्वोतोपरी सहकार्य करू, अशी ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, आज महाराष्ट्राला, काँग्रेस पक्षाला विलासराव देशमुख यांची गरज होती. आजची परिस्थिती लक्षात घेता त्यांची जुनी भाषणे सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत आणि या भाषणातून एक प्रेरणा आम्हाला नक्कीच मिळते. पण आज ते आपल्यात नाहीत ते आज आपल्यात असायला हवे होते. परिस्थिती नक्कीच वेगळी असली असती, असेही ते यावेळी म्हणाले. यावेळी जयंत पाटील म्हणाले, तो काळ आणि आजचा काळ यात खूप फरक पडला आहे. सध्या महाराष्ट्र मंत्रिमंडळात प्रत्येक जण आपली भूमिका आपल्या परीने बजावत आहेत. एकमेकांना शिवीगाळ, धमक्या असे प्रकार आजच्या राजकारणात आपण पाहत आहोत. थोर राजकीय व्यक्तीची महाराष्ट्रात रुजवलेली संस्कृती दुर्दैवाने लोप पावत आहे. यापूर्वी असे होत नव्हते. एकत्रितपणे सत्ताधारी व विरोधक लोककल्याणकारी निर्णय घेऊन राज्याला पुढे नेण्यासाठी प्रयत्न करीत होते. झटक्यात निर्णय घेणे, लोककल्याणकारी निर्णय घेताना विश्वासाहर्ता असणे हे सामर्थ्य केवळ विलासराव देशमुख यांच्यात होते. विलासराव देशमुख यांच्या मंत्रिमंडळ काळात आलेले अनुभव आणि आठवणींना उजाळा देत माजी मंत्री अमित देशमुख यांनी राज्याच्या नेतृत्त्वात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी अन्य मान्यवरांनीही लोकनेते विलासराव देशमुख यांच्या कार्याला उजाळा दिला.

माजी मंत्री अमित देशमुख देशमुख यांनी प्रास्ताविकात लोकनेते विलासराव देशमुख यांच्या आठवणींना उजाळा दिला. ते म्हणाले, आपल्याला सामान्य माणसाच्या विकासासाठी काम करायचे आहे. काँग्रेसचा विचार आपल्याला घराघरांपर्यंत न्यावा लागेल. याकामी आम्हाला जनतेने आशीर्वाद द्यावेत. लोकनेते विलासराव देशमुख यांनी माझ्या रक्तातील काँग्रेस कशी काढणार, असे उद्गार काढले होते. हे उद्गार आजच्या राजकीय परिस्थितीत महत्त्वाचे ठरते असे नमूद करून मी आहे तिथे ठिक आहे, असे सांगत सद्याच्या राजकीय चर्चांना त्यांनी पूर्णविराम दिला. यावेळी रितेश यांनी आठवणी जागवल्या तेव्हा उपस्थित जनसमुदाय गहिवरला होता.



आज भव्य शुभारंभ
सकाळी 10:08 वा.

मराठी सिने अभिनेत्री
प्रार्थना बेहेरे सोबत
शानदार शुभारंभ

सन्माननीय अतिथी

मा.संजय बनसोडे
क्रिडा व युवक कल्याण,बंदरे विकास मंत्री
महाराष्ट्र सरकार

मा.गोविंद केंद्रे
माजी आमदार, उदगीर मतदारसंघ

मा.राजेश्वर निटुरे
माजी नगराध्यक्ष,उदगीर
नगरपालिका उदगीर,जि.लातूर

मा.बसवराज पाटील नागराळकर
अध्यक्ष,कर्मवीर भाऊराव पाटील शैक्षणिक संस्था,
उदगीर जि.लातूर

मा.मल्लिकार्जुन मानकरी
अध्यक्ष,महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी
उदगीर,जि.लातूर



उदगीर मध्ये
फॅशनचा उदय !

किसान
फॅशन मॉल
मेन । वुमेन । किड्स

छत्रपती शाहु चौक, बिदर रोड, उदगीर. ४१३५१७



FANCY SAREES

| | | |
|---|---|---|
| पॉलीकॉटन हॅंडलूम साडीज् | 5 पिस | 333/- |
| सिंथेटिक पॅच साडीज् | 6 पिस | 499/- |
| पटाका प्रिंटेड साडीज् | 5 पिस | 499/- |
| झरिना प्रिंटड साडीज् | 3 पिस | 444/- |
| रॉयल सिफॉन किंवा मार्बल प्रिंट साडीज् | 3 पिस | 500/- |
| विचित्रा प्रिंट पॅच साडीज् | 2 पिस | 400/- |
| कान इरकल सिल्क किंवा ओरा सिल्क साडीज् | 2 पिस | 500/- |
| वारानसी पट्टू साडीज् | 3 पिस | 1100/- |
| रुपम प्रिंटेड पॅच साडी | 2 पिस | 800/- |
| सुभाष ब्रासो साडीज् | 2 पिस | 1000/- |
| टिशु कोटा जरी साडी | 1 पिस | 222/- |
| जुलाह पट्टू किंवा समैरा किंवा लिनेन पिंटेड साडी | 1 पिस | 333/- |
| कोमल सिल्क प्रिंटेड साडी | 1 पिस | 444/- |
| सिंपल जाल सिल्क साडी | 1 पिस | 555/- |
| डिजीटल सॉफ्टी सिल्क साडी | 1 पिस | 599/- |
| मदुराई सिल्क साडी | 1 पिस | 666/- |

प्युअर समर कॉटन प्रिंटेड साडी: 3 पिस 555/- | 2 पिस 400/- | 2 पिस 500/- | 2 पिस 550/-

PATTU SAREES

| | | |
|---|---|---|
| पैठणी पट्टू किंवा अक्षरा ब्रोकेड पट्टू | 2 पिस | 2000/- |
| रिध्दी पट्टू (वर्क ब्लाऊज) | 2 पिस | 3000/- |
| तमारा डिझायनर पट्टू | 2 पिस | 4000/- |
| श्रीदेवी कॉंट्रास्ट पट्टू | 2 पिस | 5000/- |

HAND LOOMS

| | | |
|---|---|---|
| कॉटन टॉवेल किंवा डोअर मॅट | 4 पिस | 99/- |
| टर्की टॉवेल किंवा सिंगल ब्लॅंकेट | 3 पिस | 199/- |
| सिंगल प्रिंटेड बेड शिट | 3 पिस | 333/- |
| सोलापुरी चादर | 2 पिस | 500/- |
| बॉम्बे डाईंग डबल बेड शिट | 3 पिस | 999/- |
| कॉटन पेटिकोटस् | 5 पिस | 444/- |
| २ उशी आणि डबल बेड शिटस् (गिफ्ट पॅक) | 3 पिस | 1000/- |

DRESS MATERIAL

| | | |
|---|---|---|
| सॉफ्टी प्रिंटेड सुट | 5 पिस | 1000/- |
| चंदेरी फॅन्सी सुट | 3 पिस | 1000/- |
| डिझायनर फॅन्सी सुट | 2 पिस | 1000/- |

GHAGRA LEHENGA

| | | |
|---|---|---|
| डिजीटल प्रिंटेड क्रश लेहेंगा | 2 पिस | 1500/- |
| सॉफ्टी पट्टू लेहेंगा | 2 पिस | 2000/- |
| बनारस पट्टु लेहेंगा | 2 पिस | 3000/- |



| | | |
|---|---|---|
| नाईट पॅन्टस् | 5 पिस | 500/- |
| टि-शर्ट टॉप्स् | 5 पिस | 500/- |
| टि-शर्ट टॉप्स् | 4 पिस | 500/- |
| नाईटीज् | 4 पिस | 500/- |
| स्कर्टस् | 3 पिस | 499/- |
| अलिया कट | 3 पिस | 999/- |
| पॅन्ट सेट | 2 पिस | 1000/- |
| पॅन्ट सेट | 3 पिस | 1099/- |
| पॅन्ट सेट | 3 पिस | 1199/- |

कुर्तीज्: 5 पिस 500/- | 4 पिस 500/- | 3 पिस 799/- | 3 पिस 899/- | 3 पिस 699/- | 3 पिस 1000/-

KIDS_Boys

| | | |
|---|---|---|
| टि.शर्टस् | 3 पिस | 399/- |
| कॅपरीज् | 3 पिस | 499/- |
| नाईट पॅन्टस् | 3 पिस | 550/- |
| शर्टस् | 3 पिस | 899/- |
| नाईट पॅन्टस् | 3 पिस | 999/- |
| शॉर्टस् | 5 पिस | 499/- |

KIDS_Girls

| | | |
|---|---|---|
| टॉपस् | 5 पिस | 499/- |
| प्लाजो | 5 पिस | 499/- |
| कॉटन फ्रॉक्स् | 5 पिस | 499/- |
| कॅपीज् | 3 पिस | 450/- |
| स्कर्टस् | 3 पिस | 450/- |
| शॉर्टस् | 3 पिस | 399/- |
| नाईट पॅन्टस् | 3 पिस | 599/- |
| जेगिंज् | 3 पिस | 750/- |

Men's wear



| | | |
|---|---|---|
| शर्टस् | 5 पिस | 1000/- |
| फॉर्मल ट्राऊजरस् | 5 पिस | 1000/- |
| ट्राऊजरस् | 3 पिस | 1099/- |
| ट्राऊजरस् | 3 पिस | 1199/- |
| कॉम्फर्ट जिन्स् | 3 पिस | 1299/- |
| शॉर्टस् | 5 पिस | 499/- |
| टि-शर्टस् | 3 पिस | 299/- |
| बॉक्सरस् | 5 पिस | 550/- |
| टि-शर्टस् | 3 पिस | 499/- |
| नाईट पॅन्ट | 3 पिस | 550/- |
| टि-शर्टस् | 3 पिस | 550/- |
| नाईट पॅन्ट | 3 पिस | 799/- |
| कुर्ता | 3 पिस | 1299/- |
| कॅपीज् | 3 पिस | 999/- |

*T&C Apply